वर्ष ५८ वे । अंक २०१ । पृष्ठे ६। किंमत २ रूपये। शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६
PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026 dainiksatyaprabha2015@gmail.com dainik_satyaprabha epaper.satyaprabha.com

# दैनिक सत्यप्रभा

बातम्यांसोबत विचार देणारे

## सोने स्वस्त, चांदीही घसरली

*नवी दिल्ली : सराफा बाजारात सोने आणि चांदीच्या दरात आज घसरण झाली. २४ कॅरेट सोन्याचे दर ११७५ रुपयांनी कमी होऊन १५६१४७ रुपये प्रति तोळा झाले आहेत. दुसरीकडे चांदीचे दर ५८३५ रुपयांनी कमी होऊन २६०६१४ रुपये किलोवर आले आहेत. एक किलो चांदीचा जीएसटीसह दर २६८४३२ रुपये आहे. सराफा बाजारात सोने १७६१२१ रुपयांच्या उच्चांकावर पोहोचले होते, त्या तुलनेत सध्या सोने १९९७४ रुपये स्वस्त आहे.*

## अफगाणी नबीवर आयसीसीचा बडगा

*मुंबई : दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांच्यातील बुधवारच्या सामन्यात अफगाणिस्तानचा अष्टपैलू मोहम्मद नबी याने पंचांच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केल्यामुळे आयसीसीने त्याच्यावर सामन्याच्या मानधनाच्या १५ टक्के दंडाची कारवाई केली. आफ्रिकेचा गोलंदाज लुंगी एनगिडी गोलंदाजीसाठी आला असता त्याच्या मनगटावर बांधलेल्या पिवळ्या रंगाच्या रिस्टबँडवरून नबीने आक्षेप घेतला होता.*

## दूरदर्शन

### दूरदर्शनचा सुवर्ण आवाज हरपला



**नवी दिल्ली :** दूरदर्शनच्या सुवर्ण काळातील अविभाज्य भाग असलेल्या प्रसिद्ध वृत्त निवेदिका सरला माहेश्वरी (वय ७१) यांचे आज निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय टीव्ही पत्रकारितेतील एका गौरवशाली पर्वाचा अंत झाला आहे. साधेपणा, स्पष्ट उच्चार आणि विश्वासार्हतेच्या जोरावर त्यांनी अनेक दशके प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. त्यांच्या आवाजात एक वेगळीच शांतता आणि ओघवतेपणा होता, ज्यामुळे प्रेक्षक त्यांच्या बातम्यांकडे ओढले जात असत.

## संक्षिप्त

### दादांच्या स्टाईलने सुनेत्रा पवारांच्या सूचना

**पुणे :** पुणे जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीला पालकमंत्री नात्याने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पहिल्यांदाच उपस्थिती लावली. यावेळी अजित पवार यांच्या शैलीतच त्यांनी संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या. जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा घेताना पुढील वर्षाचे नियोजन प्राधान्यक्रम ठरवून आत्ता सुरू असलेली कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

### परभणीच्या महापौरपदी उबाठाचे इकबाल सय्यद

**परभणी :** परभणीच्या महापौरपदी ठाकरे गटाचे इकबाल सय्यद विजयी झाले आहेत. इकबाल सय्यद यांना ३९ तर त्यांच्या विरोधात भाजपाच्या तिरूमला खिलारे यांना २६ मते मिळाली. तर उपमहापौरपदी काँग्रेसचे गणेश देशमुख यांची निवड झाली. महापौरपदासाठी १४ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते त्यापैकी बारा जणांनी अर्ज मागे घेतले. इकबाल सय्यद आणि तिरूमला खिल्लारे यांच्यात थेट लढत झाली.

### एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर कारवाई

**पुणे :** उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट (एचएसआरपी) बसवण्यासाठी वारंवार मुदतवाढ देऊनही प्रतिसाद कमी मिळाल्याने परिवहन विभागाने १५ फेब्रुवारीपासून कारवाईचा निर्णय घेतला आहे. एकट्या पुण्यातील २५ लाख वाहनांपैकी १०.७० लाखांनी नोंदणी केली असून ८.६२ लाख वाहनांना प्लेट बसविण्यात आली आहे. अद्याप १५ लाख वाहने प्रलंबित आहेत. मुदतीनंतर अपॉइंटमेंट घेणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई होणार आहे.

### बांगलादेश निवडणूक, ५० टक्केच मतदान

**ढाका :** बांगलादेशमध्ये बहुचर्चित सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज मतदान पार पडले. सायंकाळी हाती आलेल्या माहितीनुसार देशात ५० टक्क्यांपेक्षाही कमी मतदान झाले आहे. मतमोजणी सुरु झाली असून शुक्रवारी सकाळपर्यंत चित्र स्पष्ट होईल. बांगलादेशात १२ कोटी ७० लाखांपेक्षा जास्त पात्र मतदार आहेत. मतदानाचा आतापर्यंतचा उत्साह बघता सार्वत्रिक निवडणुकीतील एकूण मतदान हे ५० टक्क्यांपेक्षा कमी राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### लोकसभेच्या कामकाजातील गोंधळावर तिढा सुटेना

# राहुल गांधी यांच्याविरोधात भाजपाचा अपात्रता प्रस्ताव

### सदस्यत्व रद्द करुन आजीवन निवडणूक लढवण्यावर बंदी घालण्याची मागणी

वृत्तसंस्था। नवी दिल्ली

लोकसभेत आज मोठ्या राजकीय तणावाची परिस्थिती निर्माण झाली. त्याचे कारण ठरले ते भाजपाचे खा. निशिकांत दुबे यांनी मांडलेल्या विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध स्वतंत्र प्रस्तावाचे. या प्रस्तावात दुबे यांनी राहुल गांधींचे संसदीय सदस्यत्व (खासदारकी) रद्द करण्याची मागणी केली असून, त्यांना आजीवन निवडणूक लढवण्यास बंदी घालावी, अशी विनंती केली आहे. त्याआधी सरकारने राहुल गांधी यांच्याविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव आणण्याचे जाहीर केले होते. तथापि, आता हक्कभंगाचा निर्णय मागे घेऊन सत्ताधारी खासदारांनी नवी रणनीती आखली आहे.

अर्थसंकल्पावरील चर्चेत बोलताना राहुल गांधी यांनी एपस्टीन फाईल्सचा उल्लेख करुन केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांचा उल्लेख केला होता. यावर आक्रमक भूमिका घेत भाजपाचे खा. निशिकांत दुबे यांनी राहुल गांधी यांच्यावर आयुष्यभर निवडणूक लढवण्यास बंदी घातली पाहिजे, अशी मागणी केली. राहुल गांधी यांनी सोरोस फाऊंडेशन, फोर्ड फाऊंडेशन आणि युएसएआयडी यांच्याशी जोडलेले आहेत आणि भारतविरोधी कारवायांमध्ये सहभागी होण्यासाठी थायलंड, कंबोडिया, व्हिएतनाम आणि अमेरिकेसारख्या देशांचा प्रवास केला आहे. परदेशी संस्थांच्या मदतीने राहुल गांधींनी संसदेच्या अत्यंत पवित्र व्यासपीठाचा वापर लोकांच्या भावना भडकवण्यासाठी अत्यंत कुशाग्रतेने केला आहे. त्यांनी कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय केवळ भारतीय निवडणूक आयोगावरच नव्हे, तर आपल्या सर्वोच्च न्यायालयावरही निराधार आरोप केले आहेत. ज्यामुळे सरकारची प्रतिष्ठा कमी झाली असून, इतर अनेक संस्थांची प्रतिमा मलीन झाली आहे, असे खा. दुबे यांनी या प्रस्तावात म्हटले आहे. त्याआधी खा. दुबे यांनी हक्कभंग प्रस्तावासंदर्भात नोटीस दिली होती. पण, सरकारने हा निर्णय रद्द केला आहे.

दरम्यान, केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी काँग्रेसचे काही खासदार सभापतींच्या दालनात घुसून गोंधळ करत होते. प्रियंका गांधी आणि के. सी. वेणुगोपाल यांच्या उपस्थितीत ही घटना घडली, पान २ वर



### काँग्रेस खासदारांचा व्हिडीओ शेअर

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी गुरुवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या सभागृहातील एक व्हिडिओ शेअर केला. चार फेब्रुवारी रोजी संसदेत विरोधी पक्ष आणि सरकार यांच्यात झालेल्या संघर्षादरम्यान काँग्रेस खासदारांच्या एका मोठ्या गटाने त्यांना शिवीगाळ केली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना धमकावले असा आरोप रिजिजू यांनी केला. या व्हिडिओमध्ये लोकसभा अध्यक्षांच्या दालनात काँग्रेसच्या महिला भाजपा मंत्र्यांशी वाद घालताना दिसत आहेत. व्हिडिओ क्लिप शेअर करताना, रिजिजू यांनी एक्सवर लिहिले आहे, की ही एक बेकायदेशीर व्हिडिओ क्लिप आहे जी एका काँग्रेस खासदाराने घेतली होती जेव्हा २०-२५ काँग्रेस खासदार माननीय सभापतींच्या दालनात घुसले, त्यांना शिवीगाळ केली आणि माननीय पंतप्रधानांना धमकी दिली.



# जिल्ह्याच्या ५०६.३८ कोटींच्या प्रारुप आराखड्याला मंजुरी

### जिल्हा वार्षिक योजनेत २९४ कोटींची अतिरिक्त निधीची मागणी

प्रतिनिधी। नांदेड

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६-२७ अंतर्गत ५०६ कोटी ३८ लाख रुपयांच्या प्रारुप आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच विविध क्षेत्र व उपक्षेत्रांसाठी २९४ कोटी रुपयांची अतिरिक्त निधी मागणी करण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत ही मान्यता देण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयातून आ. राजेश पवार, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बालाजी कल्याणकर, आ. श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे पालकमंत्री अतुल सावे, माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण पान २ वर



### अधिक निधी देण्याची खा. चव्हाणांची मागणी

या बैठकीला दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित असलेले माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी नांदेड शहरातील विद्युत वाहिन्यांचे अंडरग्राऊंड लेबलिंग, सामान्य शिक्षण, स्मशानभूमी आदी विकासकामांसाठी निधीची आवश्यकता अधोरेखित केली. मागील वर्षाच्या तुलनेत अधिक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

## ५,०१२ सहायक प्राध्यापक पदभरतीला अखेर मान्यता

वृत्तसंस्था। मुंबई

राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गातील ५ हजार १२ रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार प्राध्यापकांची रिक्त पदे भरणे अनिवार्य होते. याच पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. एक ऑक्टोबर २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार निश्चित झालेल्या कार्यभाराच्या आधारे ५,०१२ पदे भरली जातील. ज्या शैक्षणिक संस्थांकडे नॅक मान्यता आहे, त्यांनाच नवीन पदनिर्मितीचा लाभ मिळेल. मात्र, ज्यांचे मूल्यांकन कमी आहे, त्यांना सुधारणेसाठी तीन वर्षांचा सवलतीचा कालावधी देण्याबाबत शासन स्वतंत्र धोरण आखणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदांचा सुधारित आराखडा पान २ वर

## छत्रपती शिवरायांना मानाचा मुजरा

### १२ किल्ल्यांसाठी युनेस्कोकडून वारसा स्थळ प्रमाणपत्र प्रदान

वृत्तसंस्था। पॅरिस

छत्रपती शिवाजी महाराजांच्या देदिप्यमान आणि महाराष्ट्राला सतत प्रेरणा देणाऱ्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र आज राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाऊन स्वीकारले. युनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात आला असून शेलार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादनही केले.



सुमारे दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गेल्यावर्षी ११ जुलै रोजी युनेस्कोच्या ४७ व्या अधिवेशनात, 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र घेण्यासाठी आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ पॅरिसला गेले होते, तेथे त्यांनी हे प्रमाणपत्र आज स्वीकारले. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा १२ किल्ल्यांचा समूह आज जागतिक वारसा स्थळ म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे. दरम्यान, भारताच्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पान २ वर

## स्वत:वर गोळी झाडून रचला हल्ल्याचा ड्रामा!

### गुन्हेगाराला गुन्हा दाखल करुन अटक

प्रतिनिधी। नांदेड

शहराजवळ वाजेगाव परिसरात गोळीबार झाल्याची माहिती बुधवारी वाऱ्यासारखी पसरली होती. एका तरुणावर अज्ञातांनी गोळीबार करून टोळीयुद्धाचीही प्राथमिक चर्चा होती. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तपासादरम्यान पोलिसांना काही संशयास्पद गोष्टी आढळल्या. यात पोलिसांनी सखोल चौकशी केली असता, संबंधित तरुणाने स्वत:वरच गोळी झाडून घेतल्याचे निष्पन्न झाले.

याबाबत अधिक वृत्त असे, की असद मदनी कॉलनी येथील रहिवासी शेख समी उर्फ अरबाज (वय २५ वर्ष) याने बुधवारी पहाटे अडीचच्या सुमारास वाजेगाव येथील छोटा बंधारा पुलावर ही बनावट घटना घडवून आणली. तत्पूर्वी त्याने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले होते, की सय्यद आवेज, शाहरुख कबुतर आणि अबू शूटर यांच्यासह आठ जणांनी त्याला अडवून त्याच्यावर गोळीबार केला, ज्यामध्ये एक गोळी त्याच्या उजव्या हाताच्या दंडाला लागली. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार पान २ वर

## रोहित पवारांची अस्वस्थता स्वाभाविक

### महिनाभरात अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील : सुप्रिया सुळे

वृत्तसंस्था। नवी दिल्ली

अजित पवारांच्या अपघाताबाबत रोहित पवारांची अस्वस्थता स्वाभाविक आहे. अनेक प्रश्न त्यांच्या मनात आहेत. त्यांनी त्यांच्या भावना मांडल्या. तसेच पुढच्या महिन्याभरात अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील, असे खा. सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.
अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार का, अजित पवार यांचा अपघात की घातपात या संदर्भात अनेक चर्चा सुरू आहेत, तर्कवितर्क लढवले जात आहेत. रोहित पवारांनीही मुंबई आणि दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. या पार्श्वभूमीवर खा. सुप्रिया सुळे म्हणाल्या, की अजित पवार आपल्यात नाहीत या गोष्टीवर आजही विश्वास होत नाही. अनेकांच्या मनात अनेक प्रश्न आहेत, हीच अस्वस्थता रोहित पवारांनी मांडली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या प्रकरणात चौकशी अंतिम सत्य समोर येईल, असे आश्वासन दिले आहे. राजकीय वर्तुळात अनेक चर्चा सुरू आहेत. पक्ष विलीनीकरण होणार का, कोणाच्या बैठका झाल्या कशा झाल्या, या सर्व प्रश्नांची उत्तरे यथावकाश मिळतील. महिनाभर थांबा, असे म्हणत त्यांनी विलीनीकरणाबाबतचे गूढ आणखी वाढवले. आज पान २ वर

## ७८ वर्षांनंतर बदलणार आज पीएमओचा पत्ता

वृत्तसंस्था। नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी (दि. १३) दुपारी पंतप्रधान कार्यालयचा (पीएमओ) पत्ता बदलणार आहेत. तब्बल ७८ वर्षांनंतर पीएमओचे ऑफिस स्थलांतरित करण्यात येणार आहे. साउथ ब्लॉकमधून सेवा तीर्थ नावाच्या नवीन बांधलेल्या इमारतीत हे कार्यालय हलवण्यात येणार आहे. त्यापूर्वी पंतप्रधान मोदी साउथ पान २ वर

## 'दहा वर्षांची मर्यादा' निर्णायक ठरणार?

### जिल्हा बँकेच्या आठ संचालकांना सक्तीच्या विश्रांतीची शक्यता

प्रतिनिधी। नांदेड

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची मुदत एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात संपत असून आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सहकार विभागाने तयारीला वेग दिला आहे. मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असतानाच 'बँकिंग कायदा (दुरुस्ती) २०२५'मधील महत्त्वाच्या तरतुदीमुळे विद्यमान आठ संचालकांवर सक्तीच्या विश्रांतीची टांगती तलवार लटकत आहे.



केंद्र सरकारने केलेल्या या दुरुस्तीनुसार कोणत्याही सहकारी बँकेवर एका व्यक्तीस जास्तीतजास्त दहा वर्षेच संचालक म्हणून काम करता येणार आहे. विशेष म्हणजे ही अट पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परिणामी, दहा वर्षांहून अधिक काळ संचालकपद भूषविणाऱ्या व्यक्तींना आगामी निवडणूक लढविता येणार नाही. नांदेड जिल्हा बँकेतील पान २ वर

**प्रशासन** | १२५ बंजारा-लमाण तांड्यांना महसुली गावाचा दर्जा

## जिल्ह्यात विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात!

प्रतिनिधी। नांदेड

नांदेड जिल्ह्यातील बंजारा व लमाण तांडे तसेच वाड्या-वस्त्यांचे महसुली गावात रूपांतर करण्याची प्रक्रिया आता वेगाने पुढे सरकत असून जिल्ह्यातील तब्बल १२५ तांड्यांना लवकरच महसुली गावाचा दर्जा मिळणार आहे. अनेक वर्षे मूलभूत सुविधांपासून वंचित राहिलेल्या या तांड्यांसाठी हा निर्णय ऐतिहासिक ठरणार असून विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात मानली जात आहे.

महसुली गावाचा दर्जा मिळाल्यानंतर संबंधित तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. तसेच रस्ते, अंतर्गत रस्ते, पथदिवे, पाणीपुरवठा, वीज, सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत सुविधांची उपलब्धता सुलभ होणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जमिनीचे पट्टे व कायदेशीर हक्क मिळाल्यामुळे रहिवाशांच्या मालकी हक्कांना अधिकृत मान्यता मिळणार आहे. बंजारा व लमाण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या 'संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृद्धी योजने'अंतर्गत यापूर्वीच नांदेड जिल्ह्यातील २४ तांड्यांना महसुली गावाचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. आता आणखी १२५ तांड्यांना हा दर्जा देण्यासाठीची कार्यवाही जिल्हाधिकारी पान २ वर



### काय बदल होणार?

- स्वतंत्र ग्रामपंचायतीची स्थापना
- रस्ते व अंतर्गत रस्त्यांची उभारणी
- पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थापन
- वीज व पथदिव्यांची सुविधा
- जमिनीचे कायदेशीर पट्टे
- शासकीय योजनांचा थेट लाभ
- निधीची वाढीव उपलब्धता
- स्थानिक विकासात नागरिकांचा सहभाग

## एसटी प्रवासात सवलतीचा शॉर्टकट बंद!

### एनसीएमसी कार्डाशिवाय सवलत मिळणार नाही

वृत्तसंस्था। मुंबई

एसटी महामंडळाने सवलतधारकांसाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड अनिवार्य केले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या डिजिटल उपक्रमाची माहिती दिली. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांगांना आता या स्मार्ट कार्डद्वारे प्रवासाचा लाभ घेता येईल. जुन्या कार्डच्या बदल्यात नवीन कार्ड सवलतीत मिळणार असून, बसस्थानकांवरच नोंदणीची सोय उपलब्ध आहे.

एसटीचा प्रवास अधिक स्मार्ट होणार असून, विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांसाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. रोख व्यवहारांना पर्याय म्हणून आणि सवलतींच्या वितरणात पारदर्शकता आणण्यासाठी ही प्रणाली लागू केली आहे. हे पाऊल केवळ तांत्रिक सुधारणा नसून प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारे आहे, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले. या कार्डमुळे सवलतींची अचूक नोंद होईल पान २ वर




### कार्डची किंमत आणि रिचार्ज सुविधा

नवीन कार्डसाठी १९९ रुपये (सीएसटीसह) शुल्क आकारले जाईल. प्रवाशाकडे जुने स्मार्ट कार्ड असेल, तर ते जमा केल्यास नवीन कार्ड १४९ रुपयांत उपलब्ध होईल. कार्डामध्ये किमान १०० रुपये शिल्लक असणे आवश्यक आहे आणि ५० रुपयांच्या पटीत रिचार्ज करता येईल. कंडक्टरकडील ईटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ, मोबाईल ॲप किंवा नियुक्त एजंटकडून रिचार्जची सोय असेल.

# भारतीय हवाई दलाची ताकद वाढणार; भारत-फ्रान्स दरम्यान ११४ राफेल खरेदीला मंजुरी

वृत्तसंस्था। नवी दिल्ली

भारत सरकारने संरक्षण क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल टाकत ११४ डसॉल्ट राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. संरक्षण अधिग्रहण परिषदेने या प्रस्तावाला हिरवा कंदील दाखवला असून, या व्यवहाराची अंदाजे किंमत ३.२५ लाख कोटी आहे. ही परिषद संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या मंजुरीमुळे भारताच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या लढाऊ विमान खरेदी व्यवहारांपैकी एकाचा मार्ग मोकळा झाला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे हा निर्णय फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भारत दौऱ्याच्या अगदी आधी घेण्यात आला आहे. त्यामुळे भारतफ्रान्स संरक्षण सहकार्य अधिक मजबूत होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



भारताच्या हवाई दलाकडे असलेला राफेल विमानांचा ताफा वाढवण्याच्या दृष्टीने संरक्षण मंत्रालयाने फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमानांची खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. त्याबरोबरच अमेरिकेकडून ६ जी ८ आय टेहळणी विमाने खरेदी करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. या व्यवहारामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिकच दृढ होण्याची शक्यता आहे. संरक्षण मंत्रालयाच्या डीएसी म्हणजेच संरक्षण खरेदी परिषदेने मान्यता दिलेल्या या करारांची किंमत तब्बल ३.२५ लाख कोटी रुपये एवढी आहे. हा भारताचा आतापर्यंतचा सर्वात मोठा संरक्षण करार ठरणार आहे. आता या कराराला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेटच्या संरक्षण विषय समितीने मान्यता दिल्यानंतर व्यवहाराची पुढील प्रक्रिया पार पडणार आहे. भारतीय हवाई दलाला देशाचे हवाई संरक्षण मजबूत करण्यासाठी ४२ स्काड्रनची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत हवाई दलाकडे केवळ २९ स्काड्रन आहेत. तसेच हवाई दलाच्या ताफ्यामधून अनेक जुनी विमाने निवृत्त होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर नव्या आणि आधुनिक लढाऊ विमानांची हवाई दलाला नितांत आवश्यकता होती. राफेल विमानांसाठी करण्यात आलेल्या करारानुसार १८ राफेल लढाऊ विमाने फ्रान्सच्या दसॉं एव्हिएशनकडून तयार स्थितीत येणार आहेत. तर उर्वरित ९६ विमाने ही भारतातच तयार करण्यात येतील. यामुळे मेक इन इंडियाच्या मोहिमेला मोठ्या प्रमाणावर बळ मिळणार आहे. सध्या

हवाई दलाला मोठ्या प्रमाणात विमानांची कमतरता भासत आहे. पश्चिम आणि उत्तर सीमेवरील वाढत्या सुरक्षा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही खरेदी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. भारत-फ्रान्स संरक्षण करारामुळे केवळ विमानेच नाही, तर भविष्यात इंजिन, अवियोनिक्स, शस्त्र आणि संयुक्त संशोधन प्रकल्पांमध्येही सहकार्य वाढण्याची शक्यता आहे. फ्रान्स भारताचा दीर्घकालीन आणि विश्वासार्ह संरक्षण भागीदार म्हणून महत्त्वाचा आहे. थोडक्यात सांगायचे तर, ही राफेल खरेदी भारताच्या वायुसेनेसाठी महत्त्वाची असून, राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### मेक इन इंडिया कार्यक्रमाला बळकटी

या करारात भारतात सुमारे १०० राफेल विमानांचे उत्पादन करण्याच्या तरतुदींचा समावेश असेल, ज्यामुळे तंत्रज्ञानाचे महत्त्वपूर्ण हस्तांतरण होईल आणि मेक इन इंडिया कार्यक्रमाला बळकटी मिळेल. एकदा पुष्टी झाल्यानंतर, भारत राफेलचा सर्वात मोठा गैर-फ्रेंच ऑपरेटर बनेल, जो एक ट्विन-इंजिन, बहु-भूमिका लढाऊ विमान आहे जो हवाई श्रेष्ठता आणि अचूक स्ट्राइक मोहिमांसाठी ओळखला जातो. भारताकडे आधीच ३६ राफेल आहेत, ज्यापैकी शेवटचा सी प्रकार डिसेंबर २०२४ मध्ये आला होता आणि आयएनएस विक्रांत आणि आयएनएस विक्रमादित्य या विमानवाहू जहाजांवर तैनात करण्यासाठी ६३,००० कोटी रुपयांचे २६ नौदल प्रकार (एम आवृत्ती) ऑर्डर केले आहेत.

## संक्षिप्त

### इम्रानखान यांना एका डोळ्याने दृष्टिदोष

**रावळपिंडी :** रावळपिंडीतील आडियाला तुरुंगात असलेले पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रानखान यांच्या एका डोळ्याला दृष्टिदोष झाला असून यावर पाकिस्तानच्या सुप्रीम कोर्टात एक अहवाल सादर करण्यात आला आहे. यानुसार, इम्रानखान यांची दृष्टी फक्त १५ टक्के राहिली आहे, ज्यामुळे ते योग्यरित्या पाहू शकत नाहीत. त्यांना तत्काळ उपचारांची गरज आहे. लवकर उपचार केले नाहीत तर ते दोन्ही डोळे पूर्णपणे गमावू शकतात. बीबीसी उर्दूच्या माहितीनुसार, पाकिस्तानच्या सुप्रीम कोर्टाने या प्रकरणात १६ फेब्रुवारीपूर्वी डॉक्टरांची टीम पाठवून उपचार करण्याचे निर्देश सरकारला दिले आहेत.

### चार्टर कंपन्यांचे होणार ऑडिट

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भीषण विमान अपघाताने खासगी चार्टर विमानांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने देशातील प्रमुख चार्टर कंपन्यांचे स्पेशल ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे. या तपासणीसाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली असून २५ फेब्रुवारीपर्यंत अहवाल सादर करायचा आहे. विमानांच्या तांत्रिक स्थितीची सखोल चौकशी करण्यासाठी डीजीसीएने काही मुद्दे निश्चित केले आहेत. ज्या कंपनीच्या विमानात अजित पवार यांचा अपघात झाला, त्या व्हीआरएस व्हेन्चर कंपनीचे नाव यादीत समाविष्ट नाही.

### राजपालचा मुक्काम चार दिवस तिहारमध्ये

**नवी दिल्ली :** अभिनेता राजपाल यादवला दिल्ली उच्च न्यायालयाने आज आर्थिक व्यवहाराबाबत दिलेले आश्वासन पाळण्यात अपयशी ठरल्याबद्दल फटकारले. यासोबतच, न्यायालयाने त्याच्या जामीन अर्जावरील सुनावणी सोमवारपर्यंत पुढे ढकलल्यामुळे राजपाल यादवला किमान आणखी चार रात्री तिहार कारागृहातच काढाव्या लागणार आहेत. राजपालने २०१० मध्ये अता पता लापता या आपल्या चित्रपटासाठी मुरली प्रोजेक्ट्स कंपनीकडून ५ कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते.

### मुंबई उच्च न्यायालयाने विजय मल्याला फटकारले

**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाने फरार उद्योगपती विजय मल्याविरुद्ध कडक टिप्पणी केली आणि तो भारतात परतला तरच त्याची याचिका ऐकली जाईल, असा इशारा दिला. मल्या भारतीय न्यायालयातून दिलासा मागत असताना कायदेशीर प्रक्रियेपासून वाचू शकत नाही. तुम्हाला परत यावे लागेल. जर तुम्ही परत येऊ शकत नसाल, तर आम्ही ही याचिका ऐकू शकत नाही, असे उच्च न्यायालयाने सांगितले आणि हे प्रकरण पुढे जाण्यासाठी त्याचे भारतात परत येणे ही एक पूर्वअट आहे, असेही सांगितले. मल्या कायदेशीर प्रक्रियेला टाळत असल्याने न्यायालयाने फटकारले.

स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे परिवर्तन करणार : मुख्यमंत्री

# टाटा ट्रस्ट-नामसोबत राज्य सरकारचे करार

## जलसंधारणासह आरोग्य क्षेत्रात सहकार्य वाढवणार

वृत्तसंस्था। मुंबई

महाराष्ट्र विविध क्षेत्रांसह देशाच्या प्रगतीमध्ये वेगळा ठसा उमटवला आहे. राज्याच्या प्रगतीचा वेग असाच कायम ठेवून राज्य शासनाच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे वेगाने परिवर्तन होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन यांच्यासोबत करण्यात आलेल्या करारावेळी व्यक्त केला. टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशनसोबत झालेल्या करारामळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव (आरोग्य) डॉ. निपुण विनायक, सचिव (महिला व बालविकास) अनुपकुमार यादव, टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा, नाम फाउंडेशनचे संस्थापक अभिनेते नाना पाटेकर, अभिनेते मकरंद अनासपुरे, टाटा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धार्थ शर्मा आदींसह ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर उपस्थित होत्या. नाम फाउंडेशन राज्यात जलसंधारणामध्ये मोठे काम करीत आहे. मागील काळात जल स्त्रोतांमधील गाळ काढणे, नाला,नदी खोलीकरण व रुंदीकरण आदी कामे करण्यात आली आहेत. नाम फाउंडेशनच्या सहभागाने विदर्भ व मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेल्या भागात जलसंधारणाचे मोठे काम झाले. यासाठी टाटा ट्रस्टचीही मदत झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सामंजस्य करार तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी याद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना पाठबळ देणे, समुदायांपर्यंत प्रमुख कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, नागपूर येथील सहा मान्यताप्राप्त रुग्णालयांसोबत केलेल्या करारांद्वारे, गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य देणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत दुर्धर गंभीर आजारांमध्ये सुलभ व कमी खर्चाचे उपचार उपलब्ध करून देणे आहे.



### असे आहेत १२ करार

टाटा ट्रस्टसोबत शासनाने एकूण १२ करार केलेले आहेत. यामध्ये ग्रामविकास, जलसंधारण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, गडचिरोली जिल्हा प्रशासन, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, नागपूर येथील राष्ट्रीय कर्करोग संस्था, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, मध्य भारत आयुर्विज्ञान संस्था, केअर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन, मिदास मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलसोबत सामंजस्य करारांचा समावेश आहे. तसेच नाम फाउंडेशनचा जलसंधारण विभागासोबत करार करण्यात आला आहे.

# टीम इंडियाचा नामिबियावर मोठा विजय

## मोठ्या धावसंख्येचे स्वप्न अधुरेच; फिरकीमुळे सलग दुसरा विजय

वृत्तसंस्था। नवी दिल्ली

टीम इंडियाने टी-२० वर्ल्डकपमध्ये आज सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली आहे. टीम इंडियाने नामिबियासमोर २१० धावांचे लक्ष्य दिले होते. नामेबियाने पॉवर प्लेमध्ये ५८ धावा करत चांगली सुरूवात केली होती. मात्र, पॉवर प्लेमध्ये अर्थदीप सिंगने भारताला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर वरूण चक्रवतीच्या फिरकीच्या जाळ्यात नामिबियाचे फलंदाज अडकले. वरूणने एकामागोमाग तीन झटके दिले. त्यामुळे ५८ धावांवर एक बाद असलेल्या नामिबियाची अवस्था १० षटकांत ५ बाद ८८ झाली होती. वरूणला अक्षर पटेलची चांगली साथ मिळाली. त्यानेही दोन गडी बाद केले. हार्दिक पांड्याने दोन तर बुमराने एक विकेट घेतली. शिवम दुबेने ही एक विकेट घेतली. नामिबियाचा संपूर्ण डाव ११६ धावांवर बाद झाला आणि टीम इंडियाने ९३ धावांनी विजय मिळवला.




तत्पूर्वी, नामिबियाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. अभिषेक शर्मा रुग्णालयात असल्यामुळे ईशान किशन आणि संजू सॅमसन ही जोडी सलामीला आली. संजूने वर्ल्डकपमध्ये दमदार पदार्पण केले. त्याने आठ चेंडूत तीन षटकार आणि एक चौकार मारत २७५ च्या स्ट्राईक रेटने २२ धावा केल्या. संजूचा हा झंझावत बेन शिकोंगोच्या चेंडूवर लॉरेन स्टीनकॅम्पने कॅच पकडल्यामुळे थांबला. नंतर ईशानने २४ चेंडूत पाच षटकार आणि सहा चौकार मारत ६१ धावांची वेगवान खेळी केली. गेरहार्ड इरास्मसच्या चेंडूवर बेन शिकोंगोने त्याचा कॅच पकडला. तिलक वर्माने २१ चेंडूत २५ धावा केल्यानंतर गेरहार्ड इरास्मसच्या चेंडूवर स्मिट बोल्डकडे कॅच देऊन परतला. कर्णधार सूर्यकुमार यादव अवघ्या धावा करून यष्टीचीत झाला. हार्दिक पांड्याने ४ षटकार आणि ४ चौकार मारत २८ चेंडूत ५२ धावा केल्या.तर शिव दुबे २३ धावांवर धावचित झाला. यावेळी रिंकू सिंह अपयशी ठरला, तो ६ चेंडूत अवघ्या एका धावेवर तंबूत परतला. पाठोपाठ अक्षर पटेलही शून्यावर त्रिफळाचीत झाला. वरुण चक्रवर्ती एक धाव करून नाबाद राहिला तर अर्शदीप सिंग दो धावावर धावचीत झाला. दरम्यान, टी-२० विश्वचषकात अर्धशतक झळकवणारा पहिला भारतीय यष्टीरक्षक ईशान किशन ठरला. दुसरीकडे ईशान किशन आणि संजूच्या धमाकेदार फटकेबाजीमुळे टीम इंडियाने अवघ्या ४१ चेंडूत धावफलकावर १०० धावा लावल्या. टी-२० वर्ल्ड कपच्या इतिहासातील एखाद्या संघाने सर्वात जलद शंभर धावा करण्याचा विक्रम भारतीय संघाच्या नावे झाला. पण, अखेरच्या दोन षटकात टीम इंडियाने १० धावांत ५ विकेट्स गमावल्या अन् निर्धारित षटकात भारतीय संघ नऊ बाद २०९ धावांपर्यंतच मजल मारु शकला. टीम इंडियाकडून आज मोठ्या धावसंख्येची आशा असताना मोठी निराशा झाली. विशेषतः पांड्या परतल्यानंतर भारताने एकामागून एक विकेट गमावल्या. नामिबियाचा कर्णधार गेरहार्ड इरास्मुसच्या १९ व्या षटकात टीम इंडियाने ७ धावांत ३ विकेट गमावल्या. अखेरच्या षटकातही विकेटचा सिलसिला सुरूच राहिला. या षटकात ३ धावांत टीम इंडियाने २ विकेट्स गमावल्या. सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, शिवम दुबे, रिंकू सिंह यांच्याकडून आज मोठी अपेक्षा होती. मात्र, ती फोल ठरली.

# ओमानवर श्रीलंकेचा मोठा विजय!

वृत्तसंस्था। कँडी (श्रीलंका)

टी-२० वर्ल्डकपमध्ये आज श्रीलंकेने ओमानविरुद्धची २०० पार धावसंख्येची लढाई १०५ धावांनी जिंकत सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली.

प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने तीन अर्धशतकवीरांच्या जोरावर २२५ धावा करत ओमानसमोर २२६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना ओमानच्या संघाकडून फक्त दोघांनी दुहेरी आकडा गाठता आला. ओमानकडून पाकिस्तानी वंशाच्या मोहम्मद नदीम याने ५६ चेंडूत नाबाद ५३ धावांची खेळी केली. त्याची ही खेळी ओमानला जिंकून देऊ शकली नसली तरी त्याच्या नावे रेकॉर्डची नोंद झाली आहे. यंदाच्या टी-२० वर्ल्डकपमधील तो सर्वात वयस्कर खेळाडू आहे. वयाच्या ४३ व्या वर्षी त्याने अर्धशतक झळकवण्याचा खास विक्रम आपल्या नावे केला आहे. ओमानकडून वासीम अलीची २७ धावांची खेळी वगळता एकाही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही. परिणामी, ओमानला नऊ विकेट्सच्या मोबदल्यात १२० धापांपर्यंतच मजल मारता आली.तत्पूर्वी, कुसल मेंडिस, पवन रत्नायके आणि कर्णधार दुसन शनाकाच्या अर्धशतकी खेळीवर श्रीलंकेने ५ विकेट्सच्या मोबदल्यात विक्रमी २२५ धावांचा पल्ला गाठला. पथुम निसंका १३ आणि कमिल मिशरा ८ स्वस्तात माघारी फिरल्यावर कुसर मेंडिसने ६१ धावांची खेळी केली तर पवन रथनायकेने ६० धावांचे योगदान दिले. याशिवाय कर्णधार दसुन शनाका याने २० चेंडूत ५० धावा केल्या. टी-२० वर्ल्ड कपच्या इतिहासात एका डावात तीन अर्धशतके पाहायला मिळण्याची ही चौथी वेळ ठरली.

# फुटबॉलच्या देशाचा आता क्रिकेटमध्येही डंका!

वृत्तसंस्था। मुंबई

मुंबईच्या वानखेडेच्या मैदानात इंग्लंडच्या संघाला रडवणाऱ्या नेपाळला पराभवाचा धक्का देत इटलीने टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील आपल्या पहिल्या विजयाची नोंद करत इतिहास रचला आहे. एरव्ही जगभरात फुटबॉल खेळासाठी प्रसिद्ध असलेल्या इटलीने आता क्रिकेटमध्येही डंका वाजवला आहे.

पहिल्यांदा फलंदाजी करताना नेपाळचा संघ १२३ धावांवर आटोपला होता. या धावसंख्येचा पाठलाग करताना इटलीच्या संघाकडून अँथोनी मोस्का आणि जस्टिन मोस्का या सख्ख्या बंधूंनी संघाच्या डावाची सुरुवात केली. फुटबॉलमध्ये अधिराज्य गाजवणाऱ्या इटलीच्या संघाला पहिला विजय मिळवून देण्यासाठी या जोडीने संघाला धमाकेदार सुरुवात करून दिली. या जोडीची फटकेबाजी म्हणजे दोन्ही भावांना चेंडू जणू फुटबॉलसारखाच दिसत असावा इतकी अप्रतिम होती. दोन्ही भावांनी नाबाद अर्धशतकासह संघाला पहिला आणि ऐतिहासिक विजय मिळवून दिला. क्रिकेटच्या मैदानात याआधीही भावा-भावांची जोडी मैदानात एकत्र खेळताना दिसली आहे. पण, सलामीला येऊन वर्ल्डकप स्पर्धेत नाबाद अर्धशतकासह संघाला विजय मिळवून देण्याची ही पहिलीच वेळ ठरली. जस्टिन मोस्काने ४४ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने नाबाद ६० धावांची खेळी साकारली. दुसऱ्या बाजूला अँटनीने ३२ चेंडूत ३ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने नाबाद ६२ धावांची खेळी केली. नेपाळविरुद्ध नाबाद १२४ धावांची भागीदारी रचत अँथोनी मोस्का आणि जस्टिन मोस्का यांनी संघाला एकतर्फी विजय मिळवून दिला. यासह टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील सर्वोच्च भागीदारी रचणाऱ्या बंधूंच्या यादीत ही जोडी टॉपर ठरली आहे. याआधी पाकिस्तानच्या कमरान अकमल आणि उमर अकमल या भावांनी २०१४ च्या टी-२० वर्ल्डकपमध्ये ९६ धावांची भागीदारी रचली होती. यंदाच्या हंगामात इटलीच्या संघातील हॅरी मानेंती आणि वेबन मानेंती यांनी स्कॉटलंड विरुद्धच्या सामन्यात ७३ धावांची भागीदारी रचली. इटलीने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला. क्रिशन कलुगमेजने अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत तीन विकेट घेत कर्णधाराचा निर्णय सार्थ ठरवला आणि नेपाळला अवघ्या १२३ धावांवर रोखले.

## पान १ वरून

**राहुल गांधी यांच्याविरोधात**

असा दावा केला आहे. सभापती खूप मृदू स्वभावाचे आहेत, अन्यथा कठोर कारवाई झाली असती, असेही रिजिजू म्हणाले. काँग्रेसने भाजपाचे हे आरोप फेटाळत ही कारवाई फक्त भाजपाची स्वसंरक्षण रणनीती आहे, असा आरोप केला आहे. आम्ही कोणाबरोबरही गैरवर्तन केलेले नाही. एक-दोन खासदार संतप्त झाल्यानंतर ते व्यक्त झाले होते. मी त्यांना (काँग्रेसच्या खासदारांना) प्रोत्साहन देत असल्याचा आरोप झाला. ते खोटे आहे, मी शांत बसले होते, असे प्रियंका गांधी म्हणाल्या.

**जिल्ह्याच्या ५०६.३८ कोटींच्या....**

आणि विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर सहभागी झाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५०६.३८ कोटी रुपयांच्या प्रारुप आराखड्यास मान्यता देताना अतिरिक्त मागणीबाबत शक्य तितका जास्त निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे सांगितले. पालकमंत्री अतुल सावे यांनी नांदेड हा राज्यातील मोठा जिल्हा असून मागील वर्षी अतिवृष्टीमुळे रस्ते व पूल यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याचे नमूद केले. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यास जास्तीत जास्त निधी मंजूर करण्याची मागणी त्यांनी केली. आ. राजेश पवार, आ. श्रीजया चव्हाण, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बालाजी कल्याणकर यांनीही आपल्या मतदारसंघातील प्राधान्याच्या विकासकामांसाठी निधीची मागणी मांडली. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सामान्य शिक्षण, ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, लघु पाटबंधारे, परिवहन (रस्ते व पूल), विद्युत विकास, अपारंपरिक ऊर्जा, नगरविकास, वन पर्यटन/इको-टुरिझम तसेच मागासवर्गीय कल्याण या क्षेत्रांसाठी २९४ कोटी रुपयांच्या अतिरिक्त मागणीबाबत सविस्तर सादरीकरण केले.

**५,०१२ सहायक प्राध्यापक....**

(आकृतीबंध) निश्चित करण्यासाठी उच्च शिक्षण संचालकांच्या स्तरावर एक समिती नियुक्त केली जाणार आहे. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**छत्रपती शिवरायांना....**

अर्धपुतळा युनेस्को मुख्यालयाला भेट दिला आहे. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त या पुतळ्याची स्थापना पॅरिसमध्ये युनेस्को मुख्यालयात झाली आहे. पॅरिसमधील त्यांच्या या स्मारकाला आज मंत्री शेलार यांनी अभिवादन केले.

**स्वतःवर गोळी झाडून....**

आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने या प्रकरणाचा तपास सुरू केला. तपासादरम्यान फिर्यादीने वारंवार आपले जबाब बदलले, घटनास्थळाची परिस्थिती आणि प्रत्यक्ष पुरावे यांचा मेळ बसत नव्हता. आरोपींनी आपल्याकडे गावठी पिस्तूल असल्याची टीप पोलिसांना दिली असावी, असा संशय शेख समी ऊर्फ अरबाजला होता. याच रागातून समोरच्या गटाला अडकवण्यासाठी त्याने स्वतःकडे असलेल्या गावठी पिस्तूलने स्वतःच्याच दंडावर गोळी झाडून घेतली आणि इतरांच्या नावे तक्रार दिली. दरम्यान, खोटी माहिती देऊन दुसऱ्याचे जीवित धोक्यात घालणे आणि चुकीचा दोषारोप करणे या कारणास्तव पोलिसांनी शेख समी उर्फ अरबाज याच्यावरच गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. **रोहित पवारांची अस्वस्थता....**

अजितदादा आपल्यात नाहीत. आमची चर्चा आमच्या दादासोबत झाली होती. आता त्यांच्यापश्चात कुटुंब अडचणींच्या काळातून चालले आहे. आम्ही यातून सावरत आहोत. त्यामुळे सध्याच्या चर्चेवर बोलून मला कोणाची उणीदुणी काढायची नाहीत, असेही त्या म्हणाल्या.

**७८ वर्षांनंतर बदलणार....**

ब्लॉकमध्ये झालेल्या शेवटच्या मंत्रिमंडळ बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील. या बैठकीनंतर, केंद्रीय मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी रायसिना हिलवरील एक किलोमीटरपेक्षा कमी अंतरावर असलेल्या नवीन संकुलात जातील. पाच दशकांपासून सरकारच्या सर्व महत्त्वाच्या निर्णयाचे केंद्र राहिलेले साऊथ ब्लॉकमधील पंतप्रधानांचे कार्यालय आता ब्रिटीशकालीन इमारतीतून नव्या सेवा तीर्थ येथे शिफ्ट होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी साऊथ ब्लॉकमध्ये होणाऱ्या कार्यालयात अखेरची कॅबिनेट बैठक घेतील. त्यानंतर नव्या प्रशासकीय भवनाचे उद्घाटन करण्यात येईल. पंतप्रधान कार्यालय, कॅबिनेट सचिवालय, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचे कार्यालय आणि इंडिया हाऊस येथे आहे. इंडिया हाऊसमध्ये उच्चस्तरीय शिष्टमंडळाचा पाहुणचार करण्यासाठी बनवलेले नवीन ठिकाण आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वात पहिली कॅबिनेट बैठक साऊथ ब्लॉकमध्येच झाली होती.

**दहा वर्षांची मर्यादा...**

विद्यमान अध्यक्ष भास्करराव पाटील खतगावकर यांच्यासह माजी अध्यक्ष मोहन पाटील टाकळीकर, दिनकर दहीफळे, गोविंदराव शिंदे नागेलीकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, नागेश पाटील आष्टीकर आदींचा या यादीत समावेश होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.२०१६ ते २०२१ या कालावधीत निवडून आलेले हे संचालक पुढील कार्यकाळातही पुनर्निवडीत झाले. त्यामुळे त्यांच्या संचालकपदाची सलग दहा वर्षांची मुदत पूर्ण होत आहे. निवडणूक तोंडावर असताना काही संचालकांनी मतदारसंघ बांधणी सुरू केली असली तरी नव्या कायद्यामुळे त्यांचे गणित बिघडण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, राज्यातील एका नागरी सहकारी बँकेतील संचालकांनी या तरतुदीविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचकडे धाव घेतली आहे. मात्र, अंतरिम दिलासा नाकारत सुनावणी जूनपर्यंत लांबविण्यात आली आहे. त्यामुळे सध्या तरी दुरुस्ती कायम असून नांदेड जिल्हा बँकेच्या आठ संचालकांच्या उमेदवारीवर अनिश्चिततेचे सावट आहे.सहकार विभागाने या संदर्भात रिझर्व्ह बँकेशी संपर्क साधल्याची माहिती मिळाली असून पुढील काही आठवड्यांत या प्रकरणाला राजकीय आणि कायदेशीर वळण मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

**विकासाच्या नव्या....**

राहुल कर्डिले यांच्या पुढाकारातून प्रगतीपथावर आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे या योजनेकडे विशेष लक्ष असून त्यांनी संबंधित तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना सातत्याने कार्यप्रवण करून प्रक्रियेला गती दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार आयोजित कार्यशाळेत तांड्यांचे प्रस्ताव सादर करण्यापासून ते स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यापर्यंतच्या सर्व टप्प्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले. येत्या आठ दिवसांत १२५ तांड्यांचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी दिले आहेत. यासंदर्भात आज झालेल्या कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, तहसीलदार विपीन पाटील, आनंद रहाटीकर, समन्वय अधिकारी उषा कदम तसेच विविध तालुक्यांतील नायब तहसीलदार, सहायक गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि ग्राम विकास अधिकारी असे ३०० हून अधिक अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. महसुली गावाचा दर्जा मिळाल्यानंतर विविध शासकीय योजनांतील निधीची मुबलक तरतूद उपलब्ध होणार असून तांड्यांच्या समृद्धीकडे वाटचाल अधिक वेगाने होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

**एसटी प्रवासात सवलतीचा**

आणि सुट्ट्या पैशांची चिंता मिटेल. या प्रकल्पासाठी महामंडळाने ईबिक्स टेक्नॉलॉजिस आणि एनएसडीएल पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला आहे. या नवीन कार्ड प्रणालीमध्ये समाजातील विविध घटकांना सामावून घेण्यात आले आहे. शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सरल क्रमांकाशी जोडलेले कार्ड दिले जाईल. अमृत ज्येष्ठ नागरिक, महिला सन्मान योजना अंतर्गत प्रवास करणाऱ्या महिलांना आधार संलग्न कार्ड मिळेल. यूडीआयडी क्रमांकाशी संलग्न असलेले विशेष कार्ड दिव्यांगांना दिले जाईल. दरम्यान, राज्यातील सर्व अधिस्वीकृतीधारक पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालयामार्फत हे कार्ड मिळेल. प्रवाशांच्या सोयीसाठी ३००० हून अधिक अधिकृत एजंटची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## पोलीस प्रशासनास कठोर कारवाईसाठी निवेदन

# किनवट शहरात अवैध धंदे तेजीत

प्रतिनिधी । **किनवट**

मागील कित्येक महिन्यांपासून किनवट शहरातील प्रमुख बाजारपेठेच्या ठिकाणी राजरोसपणे मटका व जुगार सुरू असून या अवैध धंद्यामुळे गोरगरिबांची कुटुंबे उध्वस्त होत आहेत तर बऱ्याच वेळा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे आपल्या स्तरावर विशेष मोहीम राबवून या अवैध धंद्यावर कायमचा आळा घालावा अशी मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की मागील कित्येक महिन्यापासून किनवट शहरात ठिकठिकाणी मटका व जुगार या धंद्यानी उच्छाद घातला आहे. शहरातील भाजीपाला मार्केट, बसस्थानक परिसर, सुभाषनगर, समतानगर, हमाल कॉलनी, रेल्वे स्टेशन, गंगानगर यासह आठवडी बाजार आणि प्रमुख चौकाच्या आजूबाजूला मिलन, श्रीदेवी, पद्मावती, टाईम बाजार, कल्याण या नावाचा मटका दिवसरात्र सुरू आहे. कमी वेळेत अधिक पैशाच्या लालसेपोटी कामगारवर्ग व मजूरदारवर्ग मटक्याच्या आहारी गेला असून दिवसभराची मजुरी या धंद्यात गुंतवून देशोधडीला लागत आहेत. आठवडी बाजाराच्या दिवशी तर शहरातील आणि ग्रामीण भागातील तरुणवर्ग व सर्वसामान्य नागरिकांची मटका बुक्कीवर अमापगर्दी पाहायला मिळते. मटका चालक हे किनवट शहरातील धनदांडगे मटका किंग असून त्यांनी सुशिक्षित बेरोजगारांना हाताशी धरून शहरात ठिकठिकाणी मटक्याचा गोरखधंदा चालू केला आहे. धंद्यात दररोज करोडो रुपयांची आर्थिक उलाढाल होत असून पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिचून जागोजागी अवैध मटका व्यवसायाने थैमान घातले असून सुज्ञ नागरिक, महिला, शालेय विद्यार्थी तसेच स्थानिक रहिवाशांना नाहक मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. मटका सुरू असलेल्या ठिकाणी कित्येकदा पैशाच्या देवाण-घेवाण वरून भांडण तंट्यांचे प्रसंग उद्भवत आहे.



### कारवाई करा : मागणी

मटक्याच्या धंद्याव्यतिरिक्त जुगार व्यवसायाने शहरात मजबूत पाय रोवले असून जागोजागी दिवसभर जुगाराचे डाव सुरु आहेत त्यामुळे किनवट शहरातील सुज्ञ नागरिक, महिला, शालेयविद्यार्थी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे दृष्टीने या अवैध मटका बुक्की व जुगार अड्ड्यावर धडक मोहीम राबवून कारवाई करावी. अशी मागणी शहरप्रमुख प्रशांत कोरडे, माजी शहरप्रमुख संतोष यलचलवार, प्रभू कोले, सुनील तकलवार, महेश मंडारे, जिन्ना पबतवार आनंद क्यातमवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### अर्जापूर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी । **अर्जापूर**

बिलोली तालुक्यातील अर्जापुर येथे लक्ष्मीमातेच्या कृपा आशीर्वादाने दि. १५ फेब्रुवारी २०२६ ते २१ फेब्रुवारी पर्यंत अखंड हरिणाम सप्ताहचा कार्यक्रम गावकरीच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. दररोज चा कार्यक्रम, पहाटे काकडी आरती, ज्ञानेश्वरी गाथा, पारायण, गाथा भजन, रामकथा, हरिपाट, कीर्तन, हरी जागर, अशी कार्यक्रमाची रूपरेषा असून, १५ फेब्रुवारी रोजी भागवताचार्य ह. भ. प. व्यकंट महाराज गुळवे, १६ - दत्ता महाराज धनजकर, १७ - वर्षाताई देशाई मेथीकर, १८ - रामेश्वर महाराज गोडसे बारडकर, १९ - रामकिशन महाराज नरसीकर, २० - विनोद जोशी महाराज बिजलवाडीकर, २१ - व्यकट महाराज गुळवे याप्रमाणे कार्यक्रम घेण्यात येत असून गाव व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहून कार्यकमाचा लाभ घ्यावा असे आवाहन गांवकरी मंडळाच्या वतीने करण्यात आले.

## महा पशुधन एक्स्पो-२०२६ च्या लोगोचे

# जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते झाले अनावरण

प्रतिनिधी । नांदेड




राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे महा पशुधन एक्स्पो-२०२६ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्स्पो-२०२६ प्रदर्शनाच्या लोगोचे अनावरण काल ११ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांच्या हस्ते झाले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. सुनिल गिरी उपस्थित होते.लोगो अनावरणप्रसंगी जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परळी वैजनाथ येथे होणारे हे महा प्रदर्शन देशातील जातीवंत पशुधन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम ठरणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकरी व पशुपालकांना दुग्ध व्यवसायातील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालक, तरुण उद्योजक व शेतकरी बांधवांनी या प्रदर्शनास मोठ्या संख्येने भेट देऊन आपले उत्पन्न वाढवावे, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. सुनिल गिरी यांनी या महा पशुधन एक्स्पोमध्ये राज्यातील तसेच राज्याबाहेरील जातीवंत गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या तसेच विविध पक्ष्यांच्या प्रजातींचे दर्शन घडणार आहे. याशिवाय आधुनिक डेअरी फार्मिंग, चारा नियोजन, दुग्ध प्रक्रिया उद्योगांचे भव्य स्टॉल्स उभारण्यात येणार असून पशुधनाचे आरोग्य, लसीकरण व वैज्ञानिक संगोपन या विषयांवर तज्ज्ञ पशुवैद्यकांची विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.

तरी जिल्ह्यातील सर्व पशुपालक, शेतकरी व नागरिकांनी या महा पशुधन एक्स्पो-२०२६ मध्ये सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

### अर्थ व्यवस्थेचा कणा

लोगो अनावरणप्रसंगी जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परळी वैजनाथ येथे होणारे हे महा प्रदर्शन देशातील जातीवंत पशुधन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम ठरणार आहे.

## संक्षिप्त

### शेतकरी संघटनेची माहूर येथे कृषी परिषद

**नांदेड** : जिल्ह्यातील माहूरगड येथे रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी शेतकरी संघटनेतर्फे कृषी तंत्रज्ञान-पिकांची व्यापार परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या परिषदेत शेतकऱ्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. पीकविमा, कर्जमाफी, शेतकरी कल्याणकारी योजना आणि शेतीमालाला मिळणारा दर या प्रमुख मुद्यांवर परिषदेत भूमिका ठरवली जाणार असल्याची माहिती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव शिंदे उंचेगावकर यांनी दिली.

### प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात समारोप

**नांदेड** : प्रयोगशाळा सहाय्यकांचे तांत्रिक ज्ञान, व्यावसायिक कौशल्ये, आरोग्यविषयक जाणीव, कार्यालयीन संवाद, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर तसेच सेवा नियमांबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्रयोगशाळा सहाय्यक प्रशिक्षण शिबिराचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात नुकताच पार पडला. शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड येथील प्राचार्य डॉ. नागेश जानराव यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. जानराव यांनी, "आज येथे मिळालेले ज्ञान उद्या प्रत्यक्ष सेवेत उतरले, तरच या प्रशिक्षणाचा खरा उपयोग होईल," असे प्रतिपादन केले.

प्रशिक्षण शिबिरात आर्थिक साक्षरता, मानवी मूल्यांचे महत्त्व, जडसंग्रह नोंदवही, भावनिक, मानसिक व सामाजिक आरोग्य, शाश्वत विकास, आहार नियंत्रण व शिस्तबद्ध दिनचर्या यावर डॉ.मोहन मैड यांनी मार्गदर्शन केले.

# विद्यार्थ्यांनी जिद्दीने अभ्यास केल्यास यश निश्चित मिळते : प्रा.डॉ.शिवशेट्टे



प्रतिनिधी । **अर्जापूर**

बिलोली तालुक्यातील अर्जापुर येथील कै. जयराम अंबेकर विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष व तथा माजी आमदार कै. गंगाधरराव पटणे यांचे पुण्यस्मरन व दहावीच्या विद्यार्थ्यांचे निरोप समारंभ कार्यकम घेण्यात आले असता त्या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना पानसरे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. नारायण शिवशंट्टे यांनी विद्यात्यांना म्हणाले कि, प्रत्येक विध्यात्र्यांने प्रामाणिक व जिद्द मेहनतीने अभ्यास केल्यास यश निश्चित मिळते. असे प्रतिपादन मार्गदर्शनात व्यक्त केले. पुढे बोलताना म्हणाले मी पण तुमच्या सारखे विद्यार्थी होतो मेहनत व जिद्दीने अभ्यास करून शिक्षण क्षेत्रात प्राध्यापक म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. प्रत्येक विद्यार्थी ठरले पाहिजे भविष्यात आपल्याला काय व्हायचे आहे. भरपूर अभ्यास केल्यास यश मिळणारच असे मत प्रा. नारायण शिवशेट्टे यांनी केले.

या कार्यकमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव चंद्रशेखर पाटील सावळीकर, उद्घाटक जयमाला पटणे, प्रमुख वक्ते बळवंतराव मोरे, रावसाहेब मोरे, विशेष सत्कार मूर्ती बिलोलीचे नगरसेवक यशवंत गादगे, पानसरे कॉलेजचे प्रा. डॉ. नारायण शिवशंट्टे, प्रमुख पाहुणे म्हणून संचालक गंगाधरराव पापुलवार, गोदावरी इबिते, संभाजी गायकवाड, कल्याण गायकवाड, प्रा. आनंदराव मांजरमकर, सुभाष देगलूरकर, पो. पा. संजय पतंगे, पत्रकार माधव पटणे, लिंगुराम पय्यावार, दिगंबर[illegible], कवठाळे, सज्जत शेख व आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रास्तावना सुभाष देगलूरकर, सूत्रसंचालन हणमंत पवार, आभार ए. एस. स्वामी यांनी केले. यावेळी सतीश जोशी, रणवीरकर, चव्हाण, मोरे, स्वामी, सोनकांबळे, गंगा पापुलवार, प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक, विध्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यकम संपल्यावर सर्वांनी भोजनाचा स्वाद घेतले.

### वीज पुरवठ्यासाठी कृती समितीची बैठक

प्रतिनिधी । **किनवट**

बोधडी परिसरातील कृषी पंपाचा विज पुरवठा रात्री दोन वाजता केला जातो आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणावर मका हे पीक घेण्यात आले आहे.

शेवटच्या टप्प्यात आलेल्या हंगामात विजेचा पुरवठा मात्र एक दिवस आड केला जात असून, तोही रात्री दोन वाजता. या परिसरात मोठ्या प्रमाणावर बिबट्या, रानडुक्कर, अस्वल असे जंगली प्राणी आहेत. रानडुक्कराच्या हल्ल्यात मागील आठवड्यात दोन शेतकरी जखमी झाले आहेत.

साप, विंचू हे तर नित्याचीच बाब आहे. अशा परिस्थितीत रात्री पिकांना पाणी देणे हे शेतकऱ्याच्या जीवावर बेतते आहे.

# अ.भा.गुरु रविदास साहित्य संमेलनाचे रविवारी आयोजन

प्रतिनिधी । **नांदेड**

आपल्या नांदेड महानगरात होणाऱ्या आठव्या अखिल भारतीय गुरु रविदास साहित्य संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थिती लावून संमेलनाची शोभा वाढवावी आणि परिवर्तनवादी विचारांचा लाभ घ्यावा असे आवाहन अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष गंगाधरराव गंगासागरे यांनी केले आहे.

संत शिरोमणी विश्वगुरू रविदास महाराज यांच्या विचारांचा प्रचार प्रसार करण्यासाठी रविवार दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी नांदेड येथे भव्य अखिल भारतीय गुरु रविदास साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात



विविध साहित्यिकांचे परिसंवाद व संत साहित्यावर आधारित व्याख्याने तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

जातीभेद विरहित समाजाची निर्मिती व गुरु रविदास यांच्या शिकवणीवर आधारित साहित्याचा गौरव करणे आणि संत शिरोमणी गुरु रविदास यांच्या विचारांचा प्रसार, समतावादी समाजाची संकल्पना, साहित्याद्वारे मानवतावादी संदेश देणे हा या साहित्य संमेलनाच्या आयोजनाचा मुख्य उद्देश आहे.

वीर कक्कया, गुरु रविदास, संत सेवालाल महाराज आणि माता रमाई यांच्या जयंती निमित्त विश्व गुरु रविदास समता परिषद सामाजिक प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने आयोजित आठव्या अखिल भारतीय एक दिवसीय गुरु रविदास साहित्य संमेलनाच्या अध्यक्षास्थानी प्रा. डॉ. निर्मला भामोदे ह्या राहणार असून विशेष अतिथी स. बाबा बलविंदर सिंघ यांची उपस्थिती राहणार आहे.

या साहित्य संमेलनाचे उद्घाटक शहाजी उमाप यांच्या हस्ते होणार आहे.संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून आदिवासी युवा नेते प्रवीण जेठेवाड, आयोजक मनीषभाऊ कावळे , निमंत्रक उत्तम गायकवाड, मुख्य प्रवर्तक इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर हे जय्यत तयारी केली आहे.

बहुजन समाजातील सर्व साहित्यिक, विचारवंत, अभ्यासक, कवी, लेखक, कथाकार, सर्व कलाकार, साहित्य रसिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संमेलनाची शोभा वाढवावी आणि परिवर्तनवादी विचारांचा लाभ घ्यावा असे आवाहन अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे नांदेड जिल्हाध्यक्ष गंगाधरराव गंगासागरे यांनी केले आहे .


## Missing Documents

Name - Rathod Raj Darasing हरवले Documents → MS-CIT certificate And Typing certificate (English 30 WPM)

**:: Address ::**
Tukaram Chandi Niwas,
MataguJariji Nagar, Namaskar chowk, Nanded
Documents हरवले ठिकाण→ Namaskar चौक ते शेतकरी पुतळाकडे जाताना (Date - 10/02 /2026)
Mobile no- 7666577717 / 9371272642

## CHANGE IN NAME

MY OLD NAME IS MINHAJKAUSAR & FATHER'S NAME IS SHAIKAHMED & MOTHER'S NAME IS HALEEMA BEE WHICH I AM CHANGING AS NEW NAME MINHAJ KAUSAR AND FATHER'S NAME IS SHAIKH AHMED AND MOTHER'S NAME IS HALIMA BEGUM. HENCE FORTH MY ALL CORRESPONDECE WILL BE DONE AS PER MY NEW NAME PLEASE CONSIDER THE SAME.
SING BY: MINHAJ KAUSAR SHAIKH AHMED
**::ADDRESS ::**
HO.NO. 7-1-97, ITWARA BAAZAR BUSAR LAIN
OPPOSITE QADRI
HOSPITAL NANDED (43164),
**MOBILE: 9421122720/ 8412078767**


**नगर परिषद भोकर जि.नांदेड**

**जाहीर प्रगटन**

श्री/श्रीमती/सौ.पुंडलिक विठ्ठलराव गर्जे गट क्र. ३०५ मधील प्लॉट ज्याचा जुना वार्ड क्र.०५ जुना मालमत्ता क्र. D ३०१/७७ नवीन वार्ड क्र.१६ नवीन मालमत्ता क्र. १६३८/७७ वर बांधकाम परवानगी मिळण्याकरिता नगरपरिषद नोंदणीकृत आर्कीटेक्ट/ इंजिनिअर यांचेद्वारे ऑनलाइन अर्ज सादर केला आहे.
जागेची रुंदी उत्तर-दक्षिण :- ३२.९२ मी.
जागेची रुंदी पूर्व-पश्चिम : - ९.२२ मी.
जागेची चतु:सिमा उत्तर :- भोकर- म्हैसा रोड
जागेची चतु:सिमा दक्षिण :- खंडेराव शामराव
जागेची चतु:सिमा पूर्वेस :- खंडेराव शामराव
जागेची चतु:सिमा पश्चिमेस :- सदरील जागेपैकी शिल्लक

वरील चतु:सीमेतील जागेवर बांधकाम परवानगी देणेबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितानी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाचे आत मुख्याधिकारी, नगरपरिषद भोकर यांचेकडे दाखल करावी. मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर,जि.नांदेड**

**नगर परिषद भोकर जि.नांदेड**

**जाहीर प्रगटन**

श्री/श्रीमती/सौ. सुजाता आनंदराव सूर्यवंशी गट क्र.६०५ मधील प्लॉट क्र.०२ जुना वार्ड क्र. ०३ जुना मालमत्ता क्र. १०७२ नवीन वार्ड क्र.०२ नवीन मालमत्ता क्र. १३८ वर बांधकाम परवानगी मिळण्याकरिता नगरपरिषद नोंदणीकृत आर्कीटेक्ट/ इंजिनिअर यांचेद्वारे ऑनलाइन अर्ज सादर केला आहे.
जागेची रुंदी उत्तर-दक्षिण :- ९.१४ मी.
जागेची रुंदी पूर्व-पश्चिम :- १५.२४ मी.
जागेची चतु:सिमा उत्तर :-रामचंद्र असावा
जागेची चतु:सिमा दक्षिण :- रस्ता
जागेची चतु:सिमा पूर्वेस :-रोड
जागेची चतु:सिमा पश्चिमेस :- नंदकुमार दत्तात्रय तुपत्तेवार

वरील चतु:सीमेतील जागेवर बांधकाम परवानगी देणेबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितानी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाचे आत मुख्याधिकारी, नगरपरिषद भोकर यांचेकडे दाखल करावी. मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर,जि.नांदेड**

जा.क्र./नपभो/नानो-६/९४०
नगरपरिषद, भोकर जि.नांदेड
दिनांक :- ११ फेब्रुवारी २०२६

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**

**जाहिरात प्रगटन**

**( नांव परिवर्तन करणे बाबद )**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री श्रीकृष्णा गणेश मंढाळकर अ.पा.क गणेश पंडीत मंढाळकर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करुन भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं.( )गट नं( )जुना वार्ड नं.( ०३. )मधील प्लॉट नं. ( )मालमत्ता नं. (८५६) नविन वार्ड नं.( ०३ )नविन मालमत्ता नं.( ५९४ ) (साईज) पुर्व-पश्चिम ९.१४ मी दक्षीण-उत्तर ५.१८ मी.
चर्तु:सिमा
१. पूर्व : पंडीत मंढाळकर ची जागा, २.पश्चिम : पंडीत मंढाळकर ची जागा
३. दक्षिण: १० फूट रस्ता,४.उत्तर बालाजी मंढाळकर
श्री: पंडीत महादु राम मंढाळकर यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता आधारे/ वारसा आधारे माझ्या नावे नांव परिवर्तन करण्यात यावे. अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे.
त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गहित धरुन खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने रदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी करिता**
**नगरपरिषद, भोकर**

जा.क्र./नपभो/नानो-६/९४३
नगरपरिषद, भोकर जि.नांदेड
दिनांक :- ११ फेब्रुवारी २०२६

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**

**जाहिरात प्रगटन**

**( नांव परिवर्तन करणे बाबद )**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री सुनिता सुरेश गुजेवाड यांनी या कार्यालयात अर्ज सादर करुन भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (५८७ ) गट नं(५८७ )जुना वार्ड नं. ( ०३ ) मधील प्लॉट नं. ( १७ ) मालमत्ता नं. (१३८०/३७) नविन वार्ड नं.(०२ )नविन मालमत्ता नं. (१०६८/३७) (साईज) पुर्व-पश्चिम ४० फुट, दक्षीण-उत्तर ३० फुट.
चर्तुः सिमा १. पूर्व : २० फुटाचा रस्ता २. पश्चिम : प्लॉट नं.१४, ३. दक्षिण : प्लॉट नं.१६ ४. उत्तर : गट नं.५८७.
श्री प्रविण लक्ष्मीनारायण सारडा यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता आधारे/ वारसा आधारे माझ्या नावे नांव परिवर्तन करण्यात यावे.अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे.
त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा,अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गहित धरुन खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने रदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी करिता**
**नगरपरिषद, भोकर**

जा.क्र./नपभो/नानो-६/९४२
नगरपरिषद, भोकर जि.नांदेड
दिनांक :-११ फेब्रुवारी २०२६

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**

**जाहिरात प्रगटन**

**( नांव परिवर्तन करणे बाबद )**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री सुनिता सुरेश गुजेवाड यांनी या कार्यालयात अर्ज सादर करुन भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे- नं. ( )गट नं(५८७)जुना वार्ड नं. ( ०३ )मधील प्लॉट नं. ( १६ )मालमत्ता नं. (१३८०/३६) नविन वार्ड नं.( ०२)नविन मालमत्ता नं. (१०६८/३६) (साईज) पुर्व-पश्चिम ४०, दक्षीण-उत्तर ३०.
**चर्तु:सिमा** :१. पूर्व : २० फुराचा रस्ता, २. पश्चिम : प्लॉट नं. १५,३. दक्षिण :२५ फुटाचा रस्ता, ४. उत्तर : प्लॉट नं. १७
श्री प्रविण लक्ष्मीनारायण सारडा यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता आधारे/ वारसा आधारे माझ्या नावे नांव परिवर्तन करण्यात यावे. अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे.
त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गहित धरुन खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने रदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी करिता**
**नगरपरिषद, भोकर**

जा.क्र./नपभो/नानो-६/९४१
नगरपरिषद, भोकर जि.नांदेड
दिनांक :-११ फेब्रुवारी २०२६

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**

**जाहिरात प्रगटन**

**( नांव परिवर्तन करणे बाबद )**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री सुमनबाई उकंडजी चव्हाण यांनी या कार्यालयात अर्ज सादर करुन भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे-नं.( ) गट नं ( २५४.)जुना वार्ड नं.(, ०५ ) मधील प्लॉट नं.( ५२ ) मालमत्ता नं. (H-२६६/८) नवीन वॉर्ड नं.( १६ )नविन मालमत्ता नं.(१३८९/१ ) (साईज)पुर्व-पश्चिम १२.२० मी दक्षीण- उत्तर :९.१५ मी
चर्तुः सिमा : १. पूर्व प्लॉट नं १७ , २ . पंश्चिम ६.मी रस्ता ३. दक्षिण : प्लाट नं. ५३, ४. उत्तर :प्लॉट नं. ५१.
श्री राजकुमार रामदास विजापुरे यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता आधारे/ वारसा आधारे माझ्या नावे नांव परिवर्तन करण्यात यावे.अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे.
त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा,अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गहित धरुन खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने रदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी करिता**
**नगरपरिषद, भोकर**

जा.क्र./नपभो/नानो-६/९३९
नगरपरिषद, भोकर जि.नांदेड
दिनांक :११ फेब्रुवारी २०२६

**नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.**

**जाहिरात प्रगटन**

**( नांव परिवर्तन करणे बाबद )**

या जाहिर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री अशोक बळीराम गोरठकर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करुन भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं.( ) गट नं( ०९ )जुना वार्ड नं.( ०३ )मधील प्लॉट नं. ( २९ )मालमत्ता नं. (२३८७ / ३४) नविन वार्ड नं. ( )नविन मालमत्ता नं.(२९१६/३४) (साईज) पुर्व-पश्चिम १२.१९ मी दक्षीण-उत्तर ७.६२ मी.
**चर्तु:सिमा** : १. पूर्व : प्लॉट नं १४, २.पश्चिम : रस्ता ३. दक्षिण :-प्लॉट नं ३० ४. उत्तर :प्लॉट नं.२८.
श्री अमित अशोक चिंतावार यांच्या नावाने यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता आधारे/ वारसा आधारे माझ्या नावे नांव परिवर्तन करण्यात यावे. अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे.
त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गहित धरुन खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने रदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी करिता**
**नगरपरिषद, भोकर**

संपादकीय

# आकाशात झेपावणार पुन्हा राफेल!

**चीन** आणि पाकिस्तान या सतत धोकादायक ठरणाऱ्या शेजारी देशांची नांगी ठेचण्यासाठी आणि देशाची संरक्षण व्यवस्था अधिक भक्कम करण्यासाठी आज भारत सरकारने मोठे पाऊल उचलले. देशाच्या हवाई दलाकडे असलेला राफेल विमानांचा ताफा वाढवण्याच्या दृष्टीने संरक्षण मंत्रालयाने फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमानांची खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण मंत्रालयाच्या संरक्षण सामुग्री खरेदी परिषदेच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला आहे. फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युअल मॅक्रॉन येत्या सोमवारपासून चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या या दौऱ्यापूर्वी केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने या करारावर शिक्कामोर्तब केले आहे. या व्यवहारामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिकच दृढ होण्याची शक्यता आहे. हा करार भारतीय हवाई दलाच्या क्षमतेला पुढील अनेक दशकांसाठी नवी दिशा देणारा आणि आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा लढाऊ विमान करार मानला जात आहे. मल्टी-रोल फायटर एअरक्राफ्ट कार्यक्रमाअंतर्गत भारत फ्रान्सकडून ११४ राफेल ही लढाऊ (एफ ४) विमाने खरेदी करण्यास सज्ज झाला असून, या कराराची एकूण किंमत ३.२५ लाख कोटी रुपये आहे. आता इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भारत भेटीदरम्यान या करारावर स्वाक्षरी होऊ शकते. हा करार केवळ तातडीच्या लढाऊ विमानांच्या गरजाच पूर्ण करणार नाही; तर राफेलसारख्या अत्याधुनिक लढाऊ जेटसाठी भारताला जागतिक उत्पादन, देखभाल आणि अपग्रेड हब म्हणूनही उभे करणार आहे. या कराराअंतर्गत भारतीय हवाई दलात ११४ राफेल एफ ४ मल्टीरोल फायटर जेट दाखल होतील. यामध्ये ८८ सिंगल-सीट विमाने, २६ ट्विन-सीट ट्रेनर व्हेरिएंट ही सर्व विमाने फक्त जमिनीवरून उड्डाण करणाऱ्या हवाई दलाच्या ऑपरेशन्ससाठी असतील. हा करार भारतीय नौदलासाठी स्वतंत्रपणे होत असलेल्या राफेल मरीन करारापेक्षा वेगळा आहे. नौदलासाठी २६ राफेल-एम विमाने विमानवाहू युद्धनौकांसाठी खरेदी केली जात आहेत. तसेच कराराचा उद्देश पूर्णपणे हवाई दलाची स्क्वॉड्रन ताकद वाढवणे हा आहे. या करारातून भारताला केवळ अत्याधुनिक लढाऊ विमाने मिळणार नाहीत, तर देशाच्या लढाऊ विमानांच्या उत्पादन क्षमतेतही मोठी वाढ होईल. मेक इन इंडिया अंतर्गत होणाऱ्या या करारात १२-१८ विमाने थेट फ्रान्समधून येतील, तर उर्वरित विमाने भारतात तयार केली जातील. त्यामुळे मेक इन इंडिया मोहिमेला बळकटी मिळेल. पाकिस्तानकडून होत असलेली आगळीक आणि चीनचे आव्हान लक्षात घेऊन या कराराकडे पाहिले जात आहे. ऑपरेशन सिंदुर दरम्यान भारतीय हवाई दलाचा नायक ठरलेली राफेल विमाने आता हवाई दलाची ताकद आणखी वाढवण्यासाठी सज्ज आहेत. या करारामुळे हवाई दलाच्या ताफ्यात आमूलाग्र बदल होणार आहेत. या कराराचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही विमाने प्रामुख्याने भारतातच तयार केली जाणार आहेत. तसेच सुरुवातीची १२ ते १८ विमाने फ्रान्सकडून थेट रेडी-टू-फ्लाय स्थितीत घेतली जातील, जेणेकरून हवाई दलाची तातडीची गरज पूर्ण होईल. उर्वरित विमानांची निर्मिती भारतात फ्रान्सच्या दसाँ एव्हिएशन आणि भारतीय कंपन्या (उदा. टाटा) यांच्या भागीदारीत केली जाईल. या विमानांमध्ये सुरुवातीला सुमारे ३० टक्के स्वदेशी साहित्याचा वापर असेल, जो भविष्यात ६० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. भारताने फ्रान्सकडे या विमानात भारतीय बनावटीची क्षेपणास्त्रे आणि यंत्रणा बसवण्याची परवानगी मागितली आहे. मात्र, विमानाचे सोर्स कोड फ्रान्सकडेच राहतील. भारतीय हवाई दलाच्या राफेल विमानांनी आधीच वास्तविक लढाऊ परिस्थितीत आपली क्षमता सिद्ध केली आहे. मे २०२५ मध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सुरू झालेल्या ऑपरेशन सिंदूर दरम्यान राफेल विमान तैनात करण्यात आले होते. तसेच, लडाख प्रदेशात धोरणात्मकदृष्ट्या राफेल विमान तैनात आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये या विमानांनी स्कॅल्प क्रूझ क्षेपणास्त्राचा यशस्वी वापर केला, जे २५० किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरील लक्ष्यांना अत्यंत अचूकतेने मारण्यास सक्षम आहे. राफेल लढाऊ विमान लांब पल्ल्याच्या उल्का हवेतून हवेत मारणारे क्षेपणास्त्र, हॅमर स्टँड-ऑफ स्ट्राइक शस्त्र आणि स्पेक्ट्रा प्रगत इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणालीने सुसज्ज आहेत. अत्याधुनिक रडार आणि लक्ष्यीकरण प्रणालींमुळे हे विमान आधुनिक युद्धात अत्यंत प्रभावी ठरतात. या जबरदस्त कामगिरीमुळेच भारताने अमेरिका आणि रशियाच्या पाचव्या पिढीतील विमानांच्या ऑफरऐवजी राफेलला पसंती दिली आहे. या करारामुळे भारत आणि फ्रान्स दरम्यान दीर्घकालीन धोरणात्मक भागीदारी मजबूत होईल, मेक इन इंडिया कार्यक्रमालाही यामुळे मोठा बळकटी मिळेल. शिवाय भारत संरक्षण उत्पादनात स्वयंपूर्णतेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलेल. या करारामुळे भारत फ्रान्सबाहेर राफेलचा सर्वात मोठा ऑपरेटर बनेल. राफेल हे दोन इंजिन असलेले बहु-भूमिका लढाऊ विमान असून ते हवाई श्रेष्ठता तसेच अचूक हल्ल्यांसाठी जगभरात ओळखले जाते. भारताने आतापर्यंत ३६ राफेल लढाऊ विमाने आपल्या ताफ्यात समाविष्ट केली आहेत. डिसेंबर २०२४ मध्ये हवाई दलाला राफेलचा 'सी' प्रकार मिळाला, तर नौदलासाठी ६३,००० कोटींच्या करारात २६ राफेल मरीन विमानांची खरेदी देखील झाली आहे. नौदलाच्या करारात चार दोन-सीट प्रशिक्षण विमाने, देखभाल आणि लॉजिस्टिक्स सपोर्ट तसेच वैमानिक आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणही समाविष्ट आहे. या विमाने आयएनएस विक्रांत आणि आयएनएस विक्रमादित्य जहाजांवर तैनात होतील आणि डिलिव्हरी २०३० पर्यंत पूर्ण होईल. सध्या भारतीय हवाई दलाकडे ३६ राफेल विमाने असून नौदलानेही २६ विमानांची ऑर्डर दिली आहे. हा नवीन करार पूर्ण झाल्यास भारतीय सैन्यदलाकडे एकूण राफेल विमानांची संख्या १७६ होईल. यामुळे चीन आणि पाकिस्तानच्या सीमेवर भारताचे वर्चस्व अधिक मजबूत होणार आहे. शिवाय पश्चिम आणि उत्तर सीमेवरील वाढत्या सुरक्षा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही खरेदी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. या निर्णयामुळे केवळ विमानेच नाही, तर भविष्यात इंजिन, अवियोनिक्स, शस्त्र आणि संयुक्त संशोधन प्रकल्पांमध्येही उभय देशांत सहकार्य वाढण्याची शक्यता आहे. फ्रान्स भारताचा दीर्घकालीन आणि विश्वासार्ह संरक्षण भागीदार म्हणून महत्त्वाचा आहे. त्यामुळे राफेल खरेदी भारताच्या वायुसेनेसाठी महत्त्वाची असून, राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. त्याचवेळी चीन-पाकिस्तानमधील वाढता लष्करी समन्वय भारतासाठी मोठे आव्हान ठरत आहे. अशा परिस्थितीत कमी जोखमीची, सिद्ध आणि वेळेत मिळणारी क्षमता म्हणून राफेल हा सर्वोत्तम पर्याय मानला जात आहे. या कराराअंतर्गत राफेल एफ ४ चा हा कार्यक्रम यशस्वी ठरल्यास २०३० च्या दशकात भारतीय हवाई दलाचा कणा म्हणून राफेल उभा राहील आणि तेजस एमके-२ व एमसीएसारख्या स्वदेशी प्रकल्पांना परिपक्व होण्यासाठी मौल्यवान वेळ मिळेल. त्यामुळे राफेल करार हा भारताची फ्रान्ससोबतची वाढती संरक्षण भागीदारी आणि प्रगत लढाऊ तंत्रज्ञानासह हवाई दलाचे आधुनिकीकरण करण्याच्या प्रयत्नांना अधोरेखित करतो.।

# नक्षलवादमुक्तीकडे भारत सरकारची दमदार वाटचाल

**भा**रताचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलवादाचा संपूर्ण खात्मा करण्यासाठी मार्च २०२६ अखेरची स्पष्ट मुदत पुन्हा एकदा अधोरेखित करून आढावा बैठका घेण्यास सुरुवात केल्यानंतर देशातील अंतर्गत सुरक्षेच्या चर्चेला पुन्हा वेग आला आहे. अनेक दशकांपासून भारताच्या लोकशाही, विकास आणि सुरक्षिततेसमोर उभे असलेले हे गंभीर आव्हान आता निर्णायक टप्प्यावर आले असल्याचा सरकारचा दावा आहे. मागील काही वर्षांत केंद्र व राज्य सरकारांनी संयुक्तपणे राबवलेल्या कठोर कारवाया, विकासात्मक योजना आणि आत्मसमर्पण धोरणांमुळे नक्षलवाद्यांची ताकद मोठ्या प्रमाणावर खिळखिळी झाली आहे. मात्र, हा संघर्ष नेमका कसा सुरू झाला, तो किती विस्तारला, आज त्याची स्थिती काय आहे आणि लोकशाहीसमोर त्याने कोणती आव्हाने उभी केली, याचा सविस्तर आढावा घेणे आवश्यक ठरते.



नक्षलवाद म्हणजे माओवादी विचारसरणीवर आधारित सशस्त्र चळवळ. समाजातील आर्थिक विषमता, जमीनहक्कांचा प्रश्न, आदिवासी व गरीब घटकांवरील अन्याय आणि शोषण याविरोधात राज्यसत्तेविरुद्ध हिंसक मार्गाने लढा देणे, हा या चळवळीचा मुख्य गाभा राहिला आहे. संसदीय लोकशाही मार्ग नाकारून सशस्त्र क्रांतीद्वारे सत्ता उलथवून टाकण्याचा विचार नक्षलवादी मांडतात. त्यामुळेच ही चळवळ सुरुवातीला अन्यायाविरोधातील आवाज म्हणून पुढे आली असली, तरी कालांतराने तिने हिंसक आणि विध्वंसक रूप धारण केले. भारतामध्ये नक्षलवादाची सुरुवात १९६७ साली पश्चिम बंगालमधील नक्सलबारी या छोट्याशा गावातून झाली. कम्युनिस्ट विचारसरणीतील काही नेत्यांनी शेतकऱ्यांच्या जमीनहक्कांसाठी सशस्त्र उठाव केला. चारु मजूमदार, कानू सान्याल आणि जंगल संथाल हे या आंदोलनाचे प्रमुख चेहरे होते. नक्सलबारी गावाच्या नावावरूनच या चळवळीला 'नक्षलवाद' असे नाव पडले. सुरुवातीला हा उठाव स्थानिक स्वरूपाचा होता, मात्र राज्यकर्त्यांविरोधातील आक्रमक भूमिका आणि हिंसक मार्गामुळे तो लवकरच चर्चेत आला.

१९७० आणि ८० च्या दशकात नक्षलवादाने केवळ पश्चिम बंगालपुरते मर्यादित न राहता देशाच्या इतर भागांतही पाय रोवले. विशेषतः मध्य, पूर्व आणि दक्षिण भारतातील जंगलबहुल, दुर्गम आणि आदिवासी बहुसंख्य असलेल्या भागांमध्ये या चळवळीला पोषक वातावरण मिळाले. छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, बिहार, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्रातील गडचिरोली आणि मध्य प्रदेशातील काही भाग या राज्यांमध्ये नक्षलवाद प्रभावी ठरला. या सर्व प्रदेशांना मिळून 'रेड कॉरिडोर' असे संबोधले जाऊ लागले. विकासाचा अभाव, प्रशासनाची कमकुवत उपस्थिती, दळणवळण सुविधांची कमतरता, शिक्षण आणि आरोग्य सुविधांची वाणवा यामुळे नक्षलवादी संघटनांना या भागांत पाय रोवणे सोपे गेले. एकेकाळी देशातील सुमारे १२६ जिल्हे नक्षलवादाने प्रभावित होते. सरकारी यंत्रणा, पोलीस, सीआरपीएफ, राजकीय नेते, ठेकेदार आणि सामान्य नागरिक यांच्यावर हल्ले, रस्ते-पुलांची तोडफोड, खंडणी वसुली आणि अपहरण यामुळे या भागांतील जनजीवन विस्कळीत झाले. विकासकामे ठप्प झाली आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले. या हिंसाचारामुळे हजारो निष्पाप नागरिक आणि शेकडो सुरक्षा जवानांना आपले प्राण गमवावे लागले.

> **लोकशाहीच्या दृष्टीने नक्षलवाद हे अत्यंत गंभीर आव्हान ठरले. लोकशाही व्यवस्थेत बदल घडवण्यासाठी निवडणुका, संसद, न्यायालये आणि शांततामय आंदोलने हे मार्ग उपलब्ध असताना नक्षलवादाने हिंसेचा मार्ग स्वीकारला. यामुळे कायदा-व्यवस्थेवरच थेट हल्ला झाला. राज्यसत्तेची वैधता नाकारण्याचा प्रयत्न झाला आणि लोकशाही मूल्यांना सुरुंग लावण्याचे काम झाले. केंद्र सरकारने नक्षलवाद संपवण्यासाठी उचललेल्या ठोस पावलामुळे तो अंतीम घटका मोजत आहे.**

लोकशाहीच्या दृष्टीने नक्षलवाद हे अत्यंत गंभीर आव्हान ठरले. लोकशाही व्यवस्थेत बदल घडवण्यासाठी निवडणुका, संसद, न्यायालये आणि शांततामय आंदोलने हे मार्ग उपलब्ध असताना नक्षलवादाने हिंसेचा मार्ग स्वीकारला. यामुळे कायदा-व्यवस्थेवरच थेट हल्ला झाला. राज्यसत्तेची वैधता नाकारण्याचा प्रयत्न झाला आणि लोकशाही मूल्यांना सुरुंग लावण्याचे काम झाले. एकीकडे नक्षलवाद ज्या सामाजिक अन्यायाच्या मुद्द्यांकडे बोट दाखवत होता, ते प्रश्न खरे असले तरी हिंसक मार्गामुळे त्यांची विश्वासार्हता कमी झाली.

मात्र, गेल्या दहा-पंधरा वर्षांत परिस्थितीत लक्षणीय बदल घडताना दिसतो. केंद्र सरकारने नक्षलवादविरोधात केवळ बंदुकीच्या जोरावर नव्हे, तर बहुआयामी धोरण राबवले. सुरक्षा दलांच्या संयुक्त मोहिमा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गुप्तचर यंत्रणांचे बळकटीकरण यामुळे अनेक मोठे नक्षलवादी नेते ठार झाले किंवा अटक करण्यात आली. त्यामुळे संघटनांची कमांड साखळी तुटली. याच काळात आत्मसमर्पण व पुनर्वसन धोरणांमुळे अनेक नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवून मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर रस्ते, मोबाईल नेटवर्क, वीज, पाणी, आरोग्य केंद्रे, शाळा आणि रोजगार योजनांवर भर देण्यात आला. दुर्गम भागांत प्रशासनाचा थेट संपर्क वाढवण्याचा प्रयत्न झाला. या उपाययोजनांचा परिणाम म्हणून आज नक्षलवादाचा प्रभावी क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आटोक्यात आला आहे. सध्या अवघे तीन-चार डझन जिल्हे उरले असून, त्यातही हिंसक घटनांची तीव्रता कमी झाली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मार्च २०२६ अखेरपर्यंत नक्षलवाद पूर्णपणे संपवण्याचा जो निर्धार व्यक्त केला आहे, तो या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा ठरतो. सुरक्षा दलांचे मनोबल उच्च आहे आणि स्थानिक पातळीवरही सहकार्य वाढले आहे. त्यामुळे हा उद्देश साध्य होऊ शकतो, असा विश्वास सरकार व्यक्त करत आहे. नक्षलवाद हा भारताच्या इतिहासातील एक दीर्घ आणि वेदनादायी अध्याय राहिला आहे. नक्सलबारीपासून सुरू झालेला हा सशस्त्र संघर्ष आज निर्णायक वळणावर आला आहे. केंद्र सरकारने आखलेला नक्षलवादमुक्त भारताचा संकल्प यशस्वी ठरतो की नाही, हे पुढील काळ ठरवेल. मात्र, हिंसेऐवजी लोकशाही मार्ग, विकास आणि सामाजिक न्याय यांचा स्वीकार झाल्यासच या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघू शकतो, एवढे मात्र नक्की.

**(दैनिक सत्यप्रभा डेस्क)**

निमित्त

# आता प्राध्यापक भरती व्हावी



**गे**ल्या अनेक वर्षांपासून रखडलेली राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांतील प्राध्यापक भरती प्रक्रिया अखेर मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्राध्यापक भरतीसाठी ६०:४० असे नवीन सूत्र निश्चित करून त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. भरतीचे निश्चित सूत्र ठरत नसल्याने आणि वारंवार बदलणाऱ्या नियमांमुळे ही प्रक्रिया थांबली होती. मात्र, आता राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे विद्यापीठांमधील नोकरभरतीचा दरवाजा किलकिला झाला असून, हजारो उच्चशिक्षित उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील विद्यापीठांमधील मोठ्या प्रमाणात रिक्त जागा भरण्यासाठी शासनाने यापूर्वी ८०:२० आणि त्यानंतर ७५:२५ असे सूत्र मांडले होते. मात्र, या सूत्रांना उमेदवारांकडून आणि शैक्षणिक वर्तुळातून मोठा विरोध झाला होता. अखेर विधिमंडळ अधिवेशनात दिलेल्या आश्वासनानुसार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ६०:४० चे सूत्र लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या सूत्रानुसार, उमेदवाराच्या शैक्षणिक आणि संशोधनातील कामगिरीसाठी ६० टक्के गुण दिले जातील. उर्वरित ४० टक्क्यांपैकी २० टक्के गुण अध्यापन कौशल्यासाठी आणि २० टक्के गुण प्रत्यक्ष मुलाखतीसाठी निश्चित करण्यात आले आहेत.

या निर्णयाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, आता घड्याळी तासिका तत्त्वावर आणि कंत्राटी तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांचा अनुभव भरती प्रक्रियेत ग्राह्य धरला जाणार आहे. राज्यातील अनेक तरुण पिढीतील प्राध्यापक तुटपुंज्या मानधनावर वर्षानुवर्षे विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये राबत आहेत. नव्या नियमावलीनुसार, ज्यांनी किमान नऊ महिने अशा पद्धतीने काम केले आहे, त्यांच्या अनुभवाचा विचार केला जाणार आहे. यामुळे राज्यातील मोठ्या संख्येने असलेल्या अनुभवी पण सध्या तात्पुरत्या स्वरूपात काम करणाऱ्या उमेदवारांना कायमस्वरूपी नियुक्ती मिळण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे. भरती प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक व्हावी, यासाठी शासनाने काही कडक पावले उचलली आहेत. नव्या नियमांनुसार, मुलाखतीचे संपूर्ण व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे बंधनकारक असेल. यामुळे वशिलेबाजीला आळा बसेल आणि केवळ गुणवत्तेच्या जोरावर उमेदवारांची निवड होईल, असा विश्वास उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी व्यक्त केला आहे. मूल्यांकनासाठी पदवी, पदव्युत्तर पदवी, एम.फिल, शोधनिबंधांचे प्रकाशन, संशोधनासाठी मिळवलेला निधी, पेटंट निर्मिती आणि संबंधित विद्यापीठाचे रँकिंग यांसारखे निकष लावले जाणार आहेत.

या निर्णयाचे स्वागत होत असताना, काही संघटनांनी यावर आक्षेपही नोंदवले आहेत. नेट-सेट-पीएचडीधारक संघर्ष समितीच्या मते, विज्ञान शाखेचे निकष मानव्यविज्ञान आणि वाणिज्य शाखांना लावणे अन्यायकारक ठरू शकते. या शाखांमधील संशोधनाचे स्वरूप वेगळे असल्याने तिथे गुण मिळवणे कठीण जाते. तसेच, परदेशी विद्यापीठातील पदवीसाठीच्या काही जुन्या सवलती रद्द केल्यामुळे जागतिक स्तरावर शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना फटका बसू शकतो, अशीही भीती व्यक्त केली जात आहे. एकंदरीत पाहता, विद्यापीठांमधील रिक्त जागांमुळे शैक्षणिक दर्जावर होणारा परिणाम रोखण्यासाठी ही भरती प्रक्रिया होणे अत्यंत गरजेचे होते. ६०:४० च्या सूत्रामुळे संशोधनाला महत्त्व देतानाच अध्यापन कौशल्यही तपासले जाणार आहे. हे सूत्र आता प्रत्यक्षात किती प्रभावी ठरते आणि विद्यापीठांचा रिक्त जागांचा अनुशेष कधीपर्यंत भरला जातो, याकडे आता राज्यातील लाखो नेट-सेट धारक उमेदवारांचे डोळे लागले आहेत.

जगाच्या पाठीवर

# फिलिपिन्समध्ये जर्मन भाषा शिक्षण

**फि**लिपिन्समध्ये गेल्या काही वर्षांत एक बदल पाहायला मिळत आहे. येथील सरकारी शाळांमध्ये जर्मन भाषा शिकण्याची ओढ विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. एकेकाळी कठीण मानली जाणारी ही परकी भाषा आता स्थानिक शिक्षण पद्धतीचा अविभाज्य भाग बनली आहे. साधारण १५ वर्षांपूर्वी फिलिपिन्सच्या शिक्षण विभागाने स्पेशल प्रोग्राम इन फॉरेन लँग्वेजेस अंतर्गत हा उपक्रम सुरू केला होता. या मोहिमेला जर्मनीच्या ग्योथे इन्स्टिट्यूटची साथ लाभली. सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेला हा प्रवास आज हजारो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला असून, जर्मन भाषा त्यांच्यासाठी जागतिक संधींची नवी कवाडे उघडत आहे. वर्गामध्ये जेव्हा ''ग्युटन मॉर्गन'' असा सप्रेम नमस्कार होतो, तेव्हा फिलिपिनो विद्यार्थी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद देतात. जर्मनीची अर्थव्यवस्था आणि तेथील उच्च शिक्षणाच्या संधी लक्षात घेता, अनेक पालक आणि शिक्षक या भाषेकडे करिअरचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणून पाहत आहेत. येथील शिक्षकही ही भाषा शिकण्यासाठी कठोर मेहनत घेत आहेत. अनेक इंग्रजी शिक्षकांनी आता जर्मन भाषेचे प्रशिक्षण घेऊन करिअरला नवी दिशा दिली आहे. ग्योथे इन्स्टिट्यूट शिक्षकांना प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती देत आहे. या भाषिक देवाणघेवाणीमुळे विद्यार्थ्यांच्या



विचारांची कक्षा रुंदावत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. जेव्हा एखादा विद्यार्थी नवी भाषा शिकतो, तेव्हा तो त्या देशाची संस्कृती आणि तिथल्या लोकांच्या मानसिकतेशी जोडला जातो. फिलिपिन्समध्ये अनेक शाळा आता केवळ भाषा शिकवून थांबत नाहीत, तर जर्मन खाद्यपदार्थ, सण आणि कलेचे प्रदर्शन करणारे उपक्रमही राबवत आहेत. यातून दोन देशांमधील सांस्कृतिक संबंध अधिक दृढ होत आहेत. जर्मन भाषा कठीण वाटत असली तरी, नियमित सराव आणि आधुनिक शिक्षण पद्धतीमुळे आत्मसात करता येते. फिलिपिन्सच्या शिक्षण प्राधिकरणाने ग्योथे-झर्टिफिकॅट सारख्या आंतरराष्ट्रीय परीक्षांना प्रोत्साहन दिले आहे. फिलिपिन्सच्या शाळांनी जर्मन भाषेला दिलेला हा प्रतिसाद जागतिकीकरणाच्या युगात भाषिक भिंती कशा नष्ट होऊ शकतात, याचे एक उदाहरण आहे.

आरोग्याचा मूलमंत्र

# कडधान्ये खाण्याची योग्य पद्धत

**स**ध्याच्या धावपळीच्या जीवनात फिटनेस आणि उत्तम आरोग्यासाठी संतुलित आहाराचे महत्त्व वाढले आहे. जेव्हा आपण डाएट किंवा वजन कमी करण्याचा विचार करतो, तेव्हा डोळ्यासमोर सर्वात आधी 'मोड आलेली कडधान्ये' येतात. भारतीय आहारात हरभरा, मूग, मटकी, चवळी आणि वाटाणा यांसारख्या कडधान्यांना स्थान आहे. आहारतज्ज्ञांच्या मते, कडधान्ये ही नैसर्गिक पॉवरहाऊस आहेत. जेव्हा आपण कडधान्यांना मोड आणतो, तेव्हा त्यांची पोषणक्षमता कित्येक पटीने वाढते. यामध्ये प्रथिनांसोबतच जीवनसत्त्व ए, बी, सी आणि ई मुबलक प्रमाणात आढळतात. तसेच कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम आणि फायबरचा हा एक समृद्ध स्रोत आहे. मोड आलेल्या कडधान्यांमुळे शरीराची पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठतेसारख्या समस्या दूर होतात. त्यातील अँटीऑक्सिडंट्समुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते, कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहते आणि त्वचा तसेच केसांचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी तर हे कमी कॅलरीज आणि जास्त पोषण देणारे उत्तम अन्न आहे. मात्र, अनेकदा फिटनेसच्या नादात चूक करतो, ती म्हणजे कडधान्ये पूर्णपणे कच्ची खाणे. कच्ची कडधान्ये खाणे फायदेशीर वाटत असले तरी, ते आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. ओलाव्यामुळे कडधान्यांना



मोड येतात, पण याच ओलाव्यात हानिकारक बॅक्टेरिया किंवा जंतू वाढण्याची शक्यता असते. कच्ची कडधान्ये खाल्ल्याने पोटदुखी, गॅस, जुलाब किंवा अन्नातून विषबाधा होण्याचा धोका संभवतो. त्यामुळे मोड आलेली कडधान्ये हलकी वाफवून किंवा मिठाच्या पाण्यात पाच मिनिटे उकळून खाणे सुरक्षित मानले जाते. यामुळे त्यातील जंतू नष्ट होतात आणि ती पचायलाही हलकी होतात. कडधान्ये खूप जास्त शिजवू नयेत, अन्यथा त्यातील महत्त्वाची जीवनसत्त्वे नष्ट होऊ शकतात. थोडे तेल आणि मीठ घालून ती हलकी परतून घेतल्यास चविष्ट आणि पौष्टिक नाश्ता तयार होतो. योग्य वेळ, योग्य प्रमाण आणि योग्य पद्धत या त्रिसूत्रीचा वापर केला, तर मोड आलेली कडधान्ये खरोखरच निरोगी आयुष्यासाठी वरदान ठरू शकतात.

वारसा

# आदिवासींचा विस्मरणात जाणारा इतिहास जपण्याची धडपड

**ता**मिळनाडूच्या उत्तर भागातील घनदाट जंगले आणि दुर्गम टेकड्यांच्या कुशीत एक प्राचीन आणि समृद्ध जग वसलेले आहे. तिथे विखुरलेले शिलालेख, काळाच्या ओघात पुसट होत चाललेली पाषाणचित्रे आणि केवळ आदिवासी वृद्धांच्या स्मृतीत जिवंत असलेल्या मौखिक लोककथा, हा आपल्या महान संस्कृतीचा खऱ्या अर्थाने अनमोल ठेवा आहे. मात्र, आधुनिकतेचा वाढता प्रभाव, शहरीकरण, बेसुमार खाणकाम आणि सरकारी यंत्रणांचे दुर्लक्ष यामुळे हा सांस्कृतिक वारसा कायमचा पुसट होण्याच्या मार्गावर आहे. अनेक ऐतिहासिक खुणा मातीखाली दबल्या गेल्या आहेत किंवा विकासाच्या नावाखाली नष्ट होत आहेत. अशा वेळी हा इतिहास पूर्णपणे विस्मृतीत जाऊ नये, यासाठी ५२ वर्षांचे एक प्राध्यापक डॉ. सी. चंद्रशेखर अहोरात्र कष्ट घेत आहेत. धर्मपुरी येथील गव्हर्नमेंट आर्ट्स कॉलेजमध्ये इतिहास विषयाचे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले चंद्रशेखर यांनी आदिवासींच्या मौखिक इतिहासाचे आणि दुर्लक्षित वास्तूंचे दस्तऐवजीकरण करणे



हे आपल्या जीवनाचे सर्वोच्च ध्येय मानले आहे.


डॉ. चंद्रशेखर यांचा हा प्रवास केवळ शैक्षणिक कुतूहलातून किंवा पदोन्नतीसाठी केलेल्या संशोधनातून सुरू झाला नाही, तर तो एका व्यापक सांस्कृतिक चळवळीत रूपांतरित झाला आहे. ते सुट्टीच्या काळात किंवा फावल्या वेळात दुर्गम आदिवासी वाड्यांमध्ये आणि जंगलात पायी फिरून वृद्धांशी तासनतास बोलतात. त्यांच्याकडून पिढ्यानपिढ्या सांगितल्या जात असलेल्या मौखिक कथा, गाणी आणि परंपरांचे संकलन करतात. या प्रवासात त्यांना अनेकदा वीरगळ (तमिळमध्ये नडुकल ), प्राचीन दफनभूमी आणि गूढ चिन्हे कोरलेले पाषाण सापडतात. यापैकी अनेक बाबी खाणकाम किंवा स्थानिकांच्या अज्ञानामुळे धोक्यात आहेत. चंद्रशेखर यांनी या खुणांचा सखोल अर्थ लावून त्यांचा ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भ जगासमोर आणण्याचे कठीण काम हाती घेतले आहे. त्यांच्या मते, हे केवळ निर्जीव दगड नसून आपल्या पूर्वजांच्या शौर्याच्या, त्यागाच्या आणि तत्कालीन प्रगत जीवनशैलीच्या खुणा आहेत. त्या नष्ट होणे म्हणजे आपल्या अस्तित्वाचा एक तुकडा गमावण्यासारखे आहे.

या कार्यासाठी त्यांनी थोनमम वरलत्रु आयवू अरक्कत्तलाई या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली आहे. या संस्थेच्या माध्यमातून आदिवासी समुदायांचे सक्षमीकरण, त्यांच्या मुलांमध्ये इतिहासाबद्दल जागृती करत आहेत. त्यांच्या पथकातील सी. एलांधीरयान यांच्यासारखे सहकारी दोन दशकांपासून तामिळनाडूतील विविध जमातींच्या इतिहासावर आणि त्यांच्या बोलीभाषांवर काम करत आहेत. हे कार्य केवळ प्राचीन काळापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर त्यांनी १८५७ च्या उठावापूर्वीही ब्रिटीशांशी लढा देणाऱ्या आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांच्या अनेक अज्ञात कथा शोधून काढल्या आहेत. चंद्रशेखर आणि त्यांच्या टीमने अनेक शोधनिबंध आणि पुस्तके प्रकाशित केल्याने या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.

अनेकदा डोंगरदऱ्यातून प्रवासादरम्यान रानटी हत्ती, विषारी सरपटणारे प्राणी आणि कठीण हवामानाचा सामना करावा लागतो. तरीही त्यांचा संशोधनाचा उत्साह तीळमात्रही कमी झालेला नाही. त्यांच्या या धडपडीमुळेच आज अनेक ठिकाणी उत्खननात सापडलेल्या वस्तूंना आणि दुर्लक्षित ऐतिहासिक स्थळांना कायद्याचे संरक्षण मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. केवळ थंडगार ग्रंथालयांत बसून पुस्तकी संशोधन करण्यापेक्षा प्रत्यक्ष जमिनीवर उतरून, लोकांमध्ये मिसळून इतिहास अनुभवणे आणि तो जतन करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे, असे ते मानतात.

**(दैनिक सत्यप्रभा डेस्क)**

## लेखकांना आवाहन



दैनिक सत्यप्रभासाठी विविध व प्रासंगिक विषयांवर लेख लिहून पाठवावेत. योग्य त्या लेखांना प्रसिद्धी देण्यात येईल. लेखकांनी आपला लेख युनिकोडमध्ये टाईप करून **dainiksatyaprabha2015@gmail.com** या मेलवर पाठवावेत.

**कार्यकारी संपादक**

सत्यप्रभा
हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक **शिवानंद दिंगबरराव महाजन** द्वारा प्रकाशित आणि मुद्रक **संदीप विलासराव पाटील**, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२
**संपादक : शिवानंद दिंगबरराव महाजन**
**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**
या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.
https://epaper.esatyaprabha.com
र.क्रं. २७१०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०
e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

## संक्षिप्त

### मंगळसूत्राला हात, कारवाईची मागणी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात ८ फेब्रुवारी रोजी झालेल्या सीटीईटी परीक्षेच्या केंद्रावर हिंदू महिलांचे पवित्र मंगळसूत्र आणि दागिने उतरवायला लावल्याच्या निषेधार्थ हिंदू जनजागृती समितीच्या समन्वयक प्रियांका लोणे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी प्रशासनाच्या हिंदूद्वेषी धोरणाविरुद्ध घोषणाबाजी करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन करून गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.

### अन्वा परिसरात शेतकरी संकटात

**भोकरदन :** तालुक्यातील आन्वासह परिसरात सध्या भाजीपाल्याची आवक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने किमतीत प्रचंड घसरण झाली आहे. मेथीच्या चार जुड्या अवघ्या १० रुपयांत, तर किलोभर वांगीही १० रुपयांत विकावी लागत आहेत. कोथिंबिरीचे दर तर किलोला १० रुपयांपर्यंत खाली आले आहेत. व्यापाऱ्यांकडून मिळणारा हा दर वाहतूक खर्च आणि मजुरीसाठीही अपुरा पडत आहे.

### मुलींची छेडछाड, पोलिसांना साकडे

**बीड :** शहरातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस परिसरात मुलींच्या छेडछाडीच्या वाढत्या घटनांबाबत गंभीर चिंता व्यक्त करत भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर आणि नगरसेविका डॉ. सारिका क्षीरसागर यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. शहरातील मुली-महिलांच्या सुरक्षेसाठी तातडीने कडक उपाययोजना राबवाव्यात, अशी ठोस मागणी यावेळी करण्यात आली.

### नागरिकांना द्या दर्जदार सेवा

**जालना:** नागरिकांना मिळणाऱ्या सेवा या आपले सरकार या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्या विहित कालमर्यादेतच निकाली काढणे बंधनकारक आहे, असे अवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त किरण जाधव यांनी केले. त्यांनी महानगरपालिकेला भेट देऊन सेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला.

### चाकूच्या धाकावर कारचालकाची लूट

**केज :** युसूफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत लघुशंकेसाठी गाडी थांबवलेल्या स्विफ्ट डिजायर चालकाला मध्यरात्री चौघा अज्ञातांनी चाकूचा धाक दाखवून लुटल्याची घटना घडली. या लुटीत सोन्याचे दागिने, लॅपटॉप व रोख रक्कम मिळून सुमारे ४ लाख १० हजार रुपयांचा ऐवज लुटण्यात आला आहे. अंबाजोगाई येथील श्रीराम सतीश ढगे यांच्यासोबत हा प्रकार घडला. ही घटना अंकुर फाटा येथे घडली.

### वाळू माफियांना राजकीय वरदहस्त

**माजलगाव :** तालुक्यातील सांडू चिंचोलीसह सिंदफणा नदीपात्रात सुरू असलेला बेकायदेशीर वाळू उपसा म्हणजे कायदा, प्रशासन आणि पर्यावरण यांची थेट थट्टा असल्याचा आरोप बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी केला आहे. येथील हॉटेल सुखसागरमध्ये पत्रकार परिषद घेऊन त्यांनी महसूल व पोलीस प्रशासनावर थेट बोट ठेवले. राजकीय वरदहस्ताखाली गुंडांच्या टोळ्यांमार्फत वाळूचा काळाबाजार सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला.

---

विहित कालावधीत निधी खर्च करा, पालकमंत्री भोसले यांचे आदेश

# लातूरचा ५११ कोटींचा आराखडा मंजूर

प्रतिनिधी | लातूर

जिल्ह्यासाठी सन २०२६-२७ करिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३८३ कोटी ३१ लाख रुपये, जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती घटक कार्यक्रम) अंतर्गत १२५ कोटी रुपये आणि जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) अंतर्गत ३ कोटी २३ लाख रुपये अशा एकूण ५११ कोटी ५४ लाख रुपयांच्या प्रारूप आराखड्याला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. आमदार विक्रम काळे, आमदार अमित देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तसेच सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीमध्ये सहभागी झाले होते.

विविध क्षेत्रांच्या विकासासाठी २१६ कोटी ६९ लाख रुपयांची वाढीव मागणी राज्यस्तरीय बैठकीत करण्यात येणार आहे.



### या कामांवर लक्ष देण्याच्या सूचना

लातूर शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली काढण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्व. विलासराव देशमुख मार्ग आणि बाह्यवळण रस्त्याच्या कामाला गती द्यावी. छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकाप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रस्ते, उड्डाणपुलासाठी प्रारूप आराखडा तयार करावा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी अतिरिक्त निधीचा प्रस्ताव, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मारकाचा प्रस्ताव शासनाला सादर करावा. आठ किलोमीटरच्या बाह्यवळण रस्त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही गतीने करावी.

### रस्ते, सिंचन प्रकल्प दुरुस्तीसाठी निधी द्या

अहमदपूर, चाकूर तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. तीर्थवाडी ते चाकूर रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. हा प्रश्न सोडविण्याला प्राधान्य देण्यात यावे, वीज उपकेंद्रांची कामे मंजूर कामे अद्याप सुरू झालेली नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना अखंडित वीज पुरवठा होत नसल्याची बाब सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी मांडली.

---

# अनुदान घोटाळाप्रकणी महिला तलाठी जेरबंद

प्रतिनिधी | जालना

अंबड व घनसावंगी तालुक्यातील नैसर्गिक आपत्ती अनुदान घोटाळ्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने कारवाई करीत महिला तलाठयास अटक केली आहे. या प्रकरणात आतापर्यंत ३६ आरोपींना अटक करण्यात आली असून तपासाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता आहे.

अंबड व घनसावंगी तालुक्यात नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. शासनाने ४ जी.आर. काढून बाधित शेतकऱ्यांना अनुदान जाहीर केले होते. मात्र याद्या अपलोड करताना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर बोगस (शेती नावावर नसलेली) नावे समाविष्ट करून शासनाच्या निधीचा अपहार केल्याची तक्रार समोर आली होती. त्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी समिती नेमली होती. तपासादरम्यान महिला तलाठी यांचा सहभाग आढळून आल्याने त्यांना जालना शहरातून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

### २५ कोटींचा अपहार

चौकशीत २४० गावांमध्ये तब्बल २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांच्या शासकीय निधीचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

रस्त्याच्या दुरुस्तीसाठी उषोषणाचे हत्यार

# तीन गावांच्या नशिबात सहा किमीचा चिखलाचा रस्ता

प्रतिनिधी | जालना

राज्यात कोट्यवधींचे महामार्ग, सिमेंट कॉंक्रेटचे रस्ते होत असताना वाघाळा-टाकळखोपा-इंचा या तीन गावांच्या ग्रामस्थांच्या वाट्याला मात्र खड्डे, चिखल आणि प्रशासनाची बेपर्वाई आली आहे. परिसरातील पूर्णापाटी ते इंचा ते टाकळखोपा ते वाघाळा हा सुमारे ६ किमी लांबीच्या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. ठिकठिकाणी पडलेल्या मोठ्या खड्ड्यांनी नागरिकांचे जीवन असह्य झाले आहे.

टाकळखोपा गावातील सांडपाणी थेट रस्त्यावर साचत असल्याने चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. विशेषतः गावातील ७०० ते ९०० मीटरचा रस्ता पूर्णतः उखडला असून खड्ड्यांत कायम पाणी साचलेले आहे. वाहनांची सततची ये-जा सुरू असल्याने हा भाग अपघातप्रवण ठरला आहे. या गंभीर परिस्थितीकडे वारंवार लक्ष वेधूनही प्रशासनाने कानाडोळा केल्याने ग्रामस्थांनी ९ फेब्रुवारीपासून उपोषणाला सुरुवात केली आहे.

### डांबरी रस्त्याची मागणी

राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी सिमेंट कॉंक्रेटचे महामार्ग होत असताना वाघाळाटाकळखोपाइंचा ग्रामस्थांच्या वाट्याला मात्र तात्पुरती मलमपट्टीही नाही. "हा रोड डांबरी नव्हे, सिमेंट कॉंक्रेटचा करा," अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

---

## कन्नड तालुक्यात शेतकरी आत्महत्या

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

कन्नड तालुक्यातील हतनूर येथील संतोष दशरथ पंडित (वय ४४) या शेतकऱ्याने शेजाऱ्याच्या शेतातील लिंबाच्या झाडाला नॉयलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन जीवन संपविले. ही घटना ११ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली.

मृत संतोष पंडीत हतनूर शिवारातील गट क्रमांक १८४ मधील शेतवस्तीवर वास्तव्यास होते. हतनूर प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकिय अधिकारी डॉ. प्रदीप कांबळे यांनी शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला आहे. मृताच्या पश्चात आई- वडील, पत्नी, तीन मुले, एक मुलगी, दोन भाऊ, भावजय असा परिवार आहे. या घटनेची अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कैलास करवंदे, मनोज घटुरसिंग करत आहेत.

---

देवगाव रंगारी येथील प्रकार, पाण्याअभावी पिके, दैनंदिन व्यवहार धोक्यात

# खंडित वीजपुरवठ्यामुळे अनेक पंप बंद; महावितरणविरोधात शेतकऱ्यांचा उद्रेक

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर उघडले गेटचे कुलूप**

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी येथे महावितरणच्या मनमानी, ढिसाळ आणि असंवेदनशील कारभाराचा कडेलोट झाला आहे. वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे शेती, पशुपालन, छोटे उद्योग आणि घरगुती जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी महावितरणच्या कार्यालयाला कुलूप ठोकले. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होत अडचणी दूर करण्याचे आश्वासन दिले.

देवगाव रंगारीसह धोंदलगाव फिडर व परिसरातील अनेक गावांचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेकडो शेतकऱ्यांचे वीज पंप बंद पडले आहेत. याबद्दल ग्रामपंचायत व शेतकरी प्रतिनिधींनी सहायक अभियंता जोशी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी निवेदने दिली होती. मात्र, त्यांच्याकडून अडचणी सोडवण्यात आल्या नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांनी महावितरणच्या कार्यालयास कुलूप लावून आंदोलन केले. जोपर्यंत दिवसा सुरळीत वीज मिळत नाही, तोपर्यंत कोणालाही आत सोडणार नाही, असा ठाम इशारा दिला.



### पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा

अखेर कन्नड येथील वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ट्रान्सफॉर्मर तत्काळ बसवणे, फिडरवरील तांत्रिक बिघाड दूर करणे आणि दिवसा नियमित वीजपुरवठा सुरू करण्याचे लेखी व तोंडी आश्वासन दिले. अडचणी दूर झाल्या नाहीत तर पुन्हा आंदोलन करू, असा इशारा शेतकरी व ग्रामपंचायतीने दिला आहे. तीन महिन्यांपूर्वी देवगाव रंगारीसाठी १० हजार के.व्ही. क्षमतेचा, तब्बल ३० टन वजनाचा नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

---

गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव परिसरात खळबळ

# आईने काढला मुलाचा काटा; खुनासाठी मुलाचा मित्र, जावयास आर्थिक आमिष

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आलेल्या एका थरारक खूनप्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. या हत्येमागे मृताच्या आईचाच सहभाग असल्याचे पोलिस तपासातून उघड झाले आहे.

एकभुर्जी वाघलगाव शिवारातील कर्नावट यांच्या शेतातील विहिरीत २६ जानेवारी रोजी सायंकाळी एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सापडला होता. त्याचे हात-पाय दोरीने बांधलेले होते न पांढऱ्या प्लास्टिकमध्ये गुंडाळून त्याला दगड बांधून विहिरीत टाकले होते. मृताचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेप्रकरणी शिल्लेगाव पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्या आदेशानुसार तपासाला गती देण्यात आली. तांत्रिक विश्लेषण, फॉरेन्सिक पुरावे आणि गुप्त माहितीच्या आधारे मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू होते. सुरुवातीला बेपत्ता व्यक्तीची कोणतीही तक्रार नसल्याने तपास कठीण झाला होता. मात्र एक व्यक्ती बेपत्ता असल्याची माहिती मिळाल्यानंतर तपासासाठी त्या बेपत्ता व्यक्तचीच्या आईचे डीएनए नमुने घेऊन तपासणी करण्यात आली. तेव्हा विहिरीत सापडलेला मृतदेह तिच्याच मुलाचा असल्याचे स्पष्ट झाले.

अधिक चौकशी केल्यानंतर मुलाकडून त्रास होत असल्याने आईनेच त्याच्या हत्येचा कट रचल्याचे उघड झाले. तिने मुलाचा जिवलग मित्र गोरख शेकू आहिरे (रा. एकभुर्जी वाघलगाव) आणि स्वतःचा जावई कमलसिंग साहेबसिंग सिंघल (रा. टाकळीवाडी) यांना खून करण्यास प्रवृत्त केले. त्यासाठी आर्थिक आमिषही दाखवण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

### पोटुळ रेल्वे स्टेशन परिसरात खून

२३ जानेवारी २०२६ रोजी आरोपींनी मयताला पोटुळ रेल्वे स्थानक परिसरात बोलावून त्याच्यावर हल्ला करून निर्घृणपणे हत्या केली. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह प्लास्टिकमध्ये गुंडाळून दगड बांधून विहिरीत फेकण्यात आला. या प्रकरणात आणखी आरोपी समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.



---

## रिक्षाला दुचाकीची धडक, एकाचा मृत्यू

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

ॲपे रिक्षाला दुचाकी धडकून झालेल्या अपघातात बारा वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. हा अपघात ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास सिल्लोड-कन्नड रस्त्यावरील बोरगाव बाजार फाट्याजवळ घडला. सरताज शाह राजू शाह (ह. मु. मोगळपुरा, सिल्लोड), असे मृताचे नाव आहे.

राजू शाह मृत मुलासह बरकतपूरकडून सिल्लोडकडे जात होते. त्यांच्या ॲपे रिक्षाला ( (एमएच- २०, बी- ३७५९) बोरगाव बाजार फाट्याजवळ दुचाकी (एमएच- २०, एव्ही-०२९२) धडकली. यात रिक्षात समोर बसलेला मृत सरताज शाह खाली पडल्याने गंभीर जखमी झाला. अपघात होताच नागरिकांनी धाव घेत जखमी बाप-लेकाला सिल्लोड उपजिल्हा रुग्णालयात आणले. मात्र तेथील डॉक्टरांनी तपासून सरताज शाहला मृत घोषित केले.

या अपघाताची सिल्लोड ग्रामीण पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, पुढील तपास बीट जमादार विष्णू कोल्हे करीत आहेत.

---

पावणेचार कोटींचा खर्च ; तीन वर्षांपासून काम रखडले

# पाटोदा पंचायत समितीची इमारत केवळ विद्युतीकरणाअभावी पडून

प्रतिनिधी | बीड

तत्कालीन ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी विशेष बाब म्हणून मंजूर केलेल्या निधीतून पाटोदा पंचायत समितीसाठी भव्य व सुसज्ज प्रशासकीय इमारत उभी राहिली आहे. ही इमारत गेल्या दोन ते तीन वर्षांपासून वापरात येऊ शकलेली नाही. तब्बल ३ कोटी ७० लाख रुपये खर्च करूनही विद्युतीकरणाचे काम अपूर्ण असल्याने ही इमारत पडून आहे.

पाटोदा पंचायत समितीच्या नूतन इमारतीसाठी ३ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या निधीतून इमारतीचे बांधकाम आणि विद्युतीकरणाची कामे ठराविक कालावधीत पूर्ण करणे अपेक्षित होते. इमारतीचे सिमेंट-कॉंक्रिट व इतर बांधकाम पूर्ण झाले असून, प्रशासकीय दृष्ट्या ती वापरास तयार आहे. मात्र, तांत्रिक कारणांमुळे विद्युतीकरणाचे काम वेळेत पूर्ण झाले नाही.दरम्यानच्या काळात संबंधित टेंडरची मुदत संपल्याने आता विद्युतीकरणासाठी नवीन निविदा प्रक्रिया राबवावी लागणार असल्याचे जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून सांगण्यात येत आहे.

परिणामी, पूर्ण झालेली इमारत असूनही तिचा उपयोग होऊ शकलेला नाही. बांधकाम विभागाकडून इमारतीचे काम पूर्ण झाल्याचा दावा करण्यात येत असून, ती पंचायत समितीकडे हस्तांतरित करण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, विद्युतीकरण पूर्ण झाल्याशिवाय इमारत ताब्यात घेणार नाही, अशी ठाम भूमिका पंचायत समिती प्रशासनाने घेतली आहे.

गटविकास अधिकारी उद्धव सानप यांनी स्पष्ट केले की, काम पूर्ण झाल्यावरच इमारत अधिकृतपणे ताब्यात घेतली जाईल. इमारत उभी राहून दोन-तीन वर्षे उलटली असतानाही स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी किंवा संबंधित यंत्रणांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिल्याचे दिसत नाही. कोट्यवधी रुपयांचा खर्च होऊनही कारभार अजूनही जुन्याच, अपुऱ्या सुविधांच्या इमारतीतून चालवावा लागत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. केवळ वीज पुरवठा नसल्याच्या कारणावरून ही इमारत ओसाड पडून राहणे म्हणजे सरकारी निधीचा अपव्यय असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### काम पूर्ण झाल्यानंतर घेणार ताबा




इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मात्र, विद्युतीकरणाचे काम अपूर्ण असल्याने इमारत अद्याप पंचायत समितीकडे अधिकृतपणे हस्तांतरित करण्यात आलेली नाही. हे काम पूर्ण झाल्यानंतरच आम्ही इमारतीचा ताबा घेणार आहोत असे गटविकास अधिकारी उध्दव सानप यांनी सांगितले.

---


**पीक पाणी** जालना जिल्ह्यात तेलबियावर्गीय पिकाकडे पाठ

# करडई, सूर्यफुलाचे पेरणीक्षेत्र शून्यावर

वृत्तसंस्था | जालना

बाजारात सर्वाधिक मागणी असलेल्या करडई व सूर्यफुलाचे क्षेत्र जिल्ह्यातील अनेक भागात अक्षरशः शून्य टक्क्यावर आले आहे. यामुळे तेलवर्गीय पीक हद्दपारच झाल्याचे चित्र आहे. पूर्वी रब्बी हंगामात ज्वारी बरोबर करडईचे पीक घेतले जात असे, तर शेतकरी खरिपासह रब्बीत सूर्यफूल घेत होते. मात्र आता करडई व सूर्यफूल पिके घेण्याकडे सर्वच शेतकऱ्यांनी पाठ फिरविली.

सध्या सर्वत्र करडई व सूर्यफूलपासून उत्पादित तेलाचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले असले तरी शेतकऱ्यांनी पिकविलेल्या करडई व सूर्यफूलास अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी ही पिके घेण्याकडे पाठ फिरवून गहू व हरभऱ्यास पसंती दिली आहे. पूर्वी आहारात करडईचे तेल वापरणे प्रतिष्ठेचे व आरोग्यवर्धक मानले जात असत. परंतु आजकाल करडई दुर्मिळ झाली. त्यातच करडई पीक घेतल्यास ती मनुष्यबळाअभावी काढणीला अवघड ठरत आहे. तसेच यांत्रिक पद्धतीने त्याच्या काढणीवर मर्यादा आहेत. हे पीक नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यावर्षी पाऊस चांगला असल्याने शेतकऱ्यांना करडई पिकाबाबात मार्गदर्शन केले जात आहे; परंतु याहीवर्षी शेतकऱ्यांनी करडई पेरणीकडे पाठ फिरविली आहे.



### गहू व हरभरा पिकाचा पेरा वाढला

शेतकऱ्यांनी अलीकडील काळात गहू व हरभरा, मका पिकाला अधिक पसंती दिल्याने मागील वीस वर्षांपासून रब्बी हंगामातून तेलवर्गीय असलेल्या करडई व सूर्यफूलाचे पीक जवळपास इतिहास जमा होण्याच्या मार्गावर असून, यंदा यांचे क्षेत्र शून्य टक्क्यावर असल्याचे चित्र पहावयास मिळते.

---

## घुसखोरांना दोन वर्षांचा कारावास

प्रतिनिधी | जालना

बेकायदेशीररित्या भारतात प्रवेश करून वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांविरोधात जालना जिल्हा व सत्र न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश २, जालना यांनी आरोपींना दोषी ठरवत प्रत्येकी दोन वर्षांची सक्तमजुरी व प्रत्येकी ५०० रुपये दंड, दंड न भरल्यास दोन दिवसांची अतिरिक्त कैद अशी शिक्षा सुनावली आहे.

पोलीस स्टेशन परतूर येथे नोंद असलेल्या गुन्हा अंतर्गत ही कारवाई करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. तपासात उपविभागीय पोलीस अधिकारी रेंगे यांचे मार्गदर्शन लाभले.

---

# जालना बाजार समितीत तुरीला ८,४८० चा भाव

प्रतिनिधी | जालना

कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना येथे तुरीला चांगला भाव मिळत आहे. ११ फेब्रुवारी रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीत तुरीला ८,४८० रुपयांचा उच्चांकी भाव मिळाला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

बाजार समितीमध्ये विविध शेतमालाची एकूण १२ हजार ९१० क्विंटल आवक झाली. बाजारात तूर, कापूस, सोयाबीन व हरभरा या प्रमुख पिकांना समाधानकारक दर मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये दिलासा दिसून आला. तुरीच्या पांढऱ्या जातीस ८,४८० रुपये कमाल, लाल तुरीस ८,३०२ रुपये, तर काळ्या तुरीस ८,३५० रुपये दर नोंदविण्यात आला.

सोयाबीनला ५,५०० रुपये कमाल व ५,२०० रुपये सरासरी दर मिळाला. हरभरा (गावरान) ला ५,३८० रुपये, तर गहू २,६७५ रुपये कमाल दराने विकला गेला. ज्वारीस ४,४०० रुपये, मक्याला १,७०० रुपये, बाजरीस ३,२०० रुपये तर मूग व मसूरलाही मध्यम स्वरूपाचे दर मिळाले. कापूस (सी.सी.आय.) ला क्विंटलमागे कमाल ८,०१० रुपये, तर खाजगी कापसाला ७,३६० रुपये दर मिळाला. बाजार व्यवहारातून एकूण ७ कोटी ९५ लाख ९१ हजार ५१ रुपये उलाढाल झाली. आवक व भाव स्थिर राहिल्यास आगामी काळात शेतकऱ्यांना अधिक फायदा होईल.

## संक्षिप्त

### दगडवाडीत भाजपाची उद्या संवाद बैठक

**तामसा:** आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाने संघटनात्मक बांधणीवर भर दिला आहे. याच अनुषंगाने हदगाव पूर्व मंडळातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी आणि मार्गदर्शनासाठी उद्या शनिवार दि. १४ फेब्रुवारी रोजी दगडवाडी येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत भाजपाचे मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष देवसरकर यांनी दिली आहे.

### राष्ट्रीय लोकअदालतीचे जिल्ह्यात आयोजन

**नांदेड:** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्यातर्फे १४ मार्च रोजी जिल्हा न्यायालय व जिल्हयातील सर्व तालुका न्यायालय येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

### प्रयोगशाळा सहाय्यक प्रशिक्षणाचा समारोप

**नांदेड:** प्रयोगशाळा सहाय्यकांचे तांत्रिक ज्ञान, व्यावसायिक कौशल्ये, आरोग्यविषयक जाणीव, कार्यालयीन संवाद, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर तसेच सेवा नियमांबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्रयोगशाळा सहाय्यक प्रशिक्षण शिबिराचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात नुकताच पार पडला. शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड येथील प्राचार्य डॉ. नागेश जानराव यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

### मातृ-पितृ पूजन दिन उत्साहात साजरा

**नांदेड:** श्री दत्तप्रभु प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत मातृ-पितृ पूजन दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव धर्माधिकारी होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक महेश धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचे औक्षण करून पूजन केले. पालकांविषयी कृतज्ञता व आदर व्यक्त करत विद्यार्थ्यांनी भावनिक वातावरणात सहभाग घेतला.

### सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगासाठी आवाहन

**नांदेड:** प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत जिल्हा संसाधन व्यक्ती यांची सेवा विविक्षित कामांसाठी घेण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी अर्ज मंगळवार १७ फेब्रुवारी पर्यंत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, आयजी कार्यालयाजवळ पद्मजासिटी रोड नवीन कौठा नांदेड येथे प्रत्यक्ष सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी नांदेड यांनी केले आहे. संसाधान व्यक्ती या पदासाठी शैक्षणिक अर्हता सर्वप्रकारच्या पदवीधारकांना व ज्यांना सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे ज्ञान व अनुभव असणे आवश्यक आहे. यासाठी एकुण २५ जागा भरण्यात येणार आहेत.

---

ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय सेवा गावातच उपलब्ध होणार

# जिल्ह्यात आता १ हजार ३६२ आपले सरकार सेतू केंद्रांना मंजुरी

प्रतिनिधी | नांदेड

ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय सेवा गावपातळीवरच सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने मिळाव्यात यासाठी जिल्हा सेतू समिती, नांदेड यांनी मोठा निर्णय घेतला असून जिल्ह्यातील १ हजार ३२२ ग्रामपंचायतींसाठी एकूण १ हजार ३६२ ङ्कआपले सरकार सेवा केंद्र (सेतू)फ्फ सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण प्रशासनाला गती मिळणार असून नागरिकांची तालुका व जिल्हा मुख्यालयाकडे होणारी धावपळ थांबणार आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिलेल्या माहितीनुसार, इच्छुक उमेदवारांनी १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजल्यापासून ते २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. अर्ज करताना दिलेल्या अधिकृत लिंकवर जाऊन आवश्यक माहिती अचूक भरून अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील युवक-युवतींसाठी स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. विशेष म्हणजे रिक्त जागांपैकी ५ टक्के जागा दिव्यांग व्यक्तींना प्राधान्याने देण्यात येणार असल्याने सामाजिक समावेशकतेलाही चालना मिळणार आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. सदर जाहिरात, रिक्त गावांची यादी, पात्रता निकष तसेच अटी व शर्ती याबाबतची सविस्तर माहिती नांदेड जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुकांनी संकेतस्थळाला भेट देऊन माहिती घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

#### नागरिकांच्या वेळ, श्रम आणि पैशाची बचत

या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे शासनाच्या विविध योजना आणि सेवा ग्रामीण नागरिकांपर्यंत जलद, पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने पोहोचविणे हा आहे. या केंद्रांमार्फत विविध दाखले, उत्पन्न व जात प्रमाणपत्रे, परवाने, शासकीय अर्ज, तसेच इतर अनेक ऑनलाईन सेवा गावातच उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे नागरिकांचा वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च यांची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

#### केंद्राचे मुख्य उद्दिष्ट

- आधार कार्ड नोंदणी व अपडेट
- पॅन कार्ड नोंदणी
- पासपोर्ट सेवा
- जन्म व मृत्यू प्रमाणपत्र
- निवडणूक ओळखपत्र
- जमीन अभिलेख (७/१२)

#### सेवा केंद्राचे फायदे असे

- गावागावात डिजिटल सेवा उपलब्ध करुन देणे
- नोकऱ्या व उद्योजकतेला चालना
- महिलांसाठी स्वतंत्र उपजीविकेचा पर्याय
- सरकारच्या योजनांचा थेट लाभ


आपले सरकार

#### डिजिटल सक्षमीकरणाला मिळणार बळ

आपले सरकार ई-सेवा केंद्र हे भारत सरकारच्या डिजिटल इंडियाफअभियानाचा एक महत्त्वपूर्ण भाग असून ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना विविध डिजिटल शासकीय व खासगी सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा यामागील उद्देश आहे. या निर्णयामुळे नांदेड जिल्ह्यातील डिजिटल सक्षमीकरणाला नवे बळ मिळणार आहे.

---

# वाचनामुळे व्यापक समाज भान निर्माण होते : जिल्हाधिकारी



प्रतिनिधी | नांदेड

वाचनामुळे जीवनात आनंद तर निर्माण होतोच. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे विविधांगी वाचनामुळे आपल्याला आपल्याच समाजाबद्दलचे एक व्यापक असे भान निर्माण होते. आपल्या बाबतीत देखील असेच झाले असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

प्रख्यात विचारवंत प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून कर्डिले यांच्या अनोपचारिक मुलाखतीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. डॉ. विश्वधार देशमुख यांनी वाचनः साद- प्रतिसाद या विषयावर कर्डिले यांच्याशी याप्रसंगी संवाद साधला.

प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. श्रीनिवास पांडे यांनी केले तर ज्येष्ठ साहित्यिक प्रा. दत्ता भगत यांच्या हस्ते कर्डिले यांचे स्वागत करण्यात आले. प्रतिष्ठानच्या अध्यक्ष प्रा.सौ श्यामल पत्की यांनी आभार मानले.

प्रा. कुरुंदकर यांच्या जीवनाचा आणि विचारविश्वाचा नव्या पिढीला परिचय व्हावा या दृष्टीने अलीकडेच राज्याच्या माहिती आणि जनसंपर्क खात्याचे माजी महासंचालक अजय अंबेकर यांनी त्यांच्या वर एक नाटक लिहिले आहे. वर्धा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असताना आपल्या पुढाकाराने या नाटकाचा प्रयोग वर्धा जिल्ह्यात झाला होता याचा आवर्जून उल्लेख कर्डिले यांनी यावेळी केला. या संवादातून श्री. कर्डिले यांच्या वाचनानुभवाचा पट श्रोत्यांसमोर उलगडला गेला. आपले वडील रयत शिक्षण संस्थेत शिक्षक होते. ते नेहमीच ग्रंथालयामधून आपल्यासाठी पुस्तके आणत असत.

---

# संचमान्यता पूर्ण झाल्याशिवाय शिक्षकेत्तर कर्मचारी भरती नाही

प्रतिनिधी | नांदेड

राज्यातील खासगी शाळांमधील शिक्षकेतर कर्मचारी भरती आणि त्या अनुषंगाने लाभांवर तात्पुरती बंदी घालण्यात आली असून, ऑनलाइन संचमान्यता पूर्ण झाल्याशिवाय ही प्रक्रिया पुढे सरकणार नसल्याचे शिक्षण संचालनालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

यानिमित्ताने पुणे येथील शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी याबाबतचे आदेश नुकतेच निर्गमित केले आहेत. राज्य शासनाच्या निर्णयानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत निर्देश देण्यात आले होते. मात्र, सन २०२४-२५ची ऑनलाइन संचमान्यता करण्याची प्रक्रिया सध्या एनआयसी मार्फत सुरू आहे. जोपर्यंत ही संचमान्यता पूर्ण होऊन मंजूर, अतिरिक्त आणि रिक्त पदांचा अहवाल प्राप्त होत नाही, तोपर्यंत नवीन भरती प्रक्रिया राबविता येणार नाही. दरम्यान, संचमान्यतेनंतर जे कर्मचारी अतिरिक्त ठरणार आहेत, त्यांचे प्रथम इतरत्र समायोजन केले जाईल. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच रिक्त जागांवर नवीन भरतीबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष संचमान्यतेच्या प्रक्रियेकडे लागले आहे.

#### कर्मचाऱ्यांची धाकधूक वाढली

शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, जोपर्यंत पुढील आदेश येत नाहीत, तोपर्यंत कोणत्याही प्रकारची नवीन शिक्षकेतर भरती करू नये. इतकेच नाही तर भरतीशी संबंधित इतर लाभ जसे की वैयक्तिक मान्यता आणि शालार्थ आयडी देण्याची प्रक्रियाही थांबविण्याचे निर्देश विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात आले आहेत. तसेच शिक्षण संस्थांनी किती नियुक्त्या केल्या, किती जणांना वैयक्तिक मान्यता मिळाली आणि किती कर्मचाऱ्यांचे शालार्थ आयडी प्रलंबित आहेत, याची सविस्तर माहिती (२८ मे २०२५ पूर्वीची) शिक्षण संचालनालयाने मागविली आहे. यामुळे अनेक कर्मचाऱ्यांची धाकधूक वाढली असल्याचे दिसून येत आहे.

---

### महाशिवरात्री निमित्त भव्य यात्रा उत्सव

प्रतिनिधी | भोकर

येथील हेमाडपंथी महादेव मंदिराच्या समोर महाशिवरात्री निमित्त यात्रा उत्सव दि. १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला असून त्यानिमित्त भजन, कीर्तन, कबड्डी, कुस्त्यांचे सामने होणार आहेत. यात्रेच्या प्रथम दिनी उद्घाटनासाठी आ.श्रीजयाताई चव्हाण यांची उपस्थिती राहणार आहे तर कुस्त्यांच्या उद्घाटनासाठी खा. अशोकराव चव्हाण यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, उपविभागीय पोलीस अधिकारी दगडू हाके, तहसीलदार विनोद गुंडमवार, नगरपरिषद मुख्याधिकारी ऋषभ पवार, पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

---

पोलीस असल्याची बतावणी, भामट्याने केली फसवणूक

# शेतकऱ्याच्या दोन अंगठ्यांवर मारला डल्ला

प्रतिनिधी | नांदेड

आपण पोलीस असल्याची बतावणी करून दुचाकीवरून जात असलेल्या शेतकऱ्याला अडवून त्याच्या हातातील दोन सोन्याच्या अंगठ्या काढून घेत बनावट अंगठ्या देत फसवणूक केल्याची धक्कादायक घटना मुदखेड तालुक्यात ६ फेब्रुवारी रोजी दुपारी घडली. या प्रकरणी मुदखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निवघा (ता. मुदखेड) येथील शेतकरी प्रकाश माधवराव पवार (वय ५१) हे ६ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे २ ते २.३० वाजण्याच्या दरम्यान दुचाकीवरून लोखंडे व आदमाने यांच्या दुकानासमोरून जात होते. त्यावेळी दुचाकीवर आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना अडवले. संबंधितांनी स्वतःला पोलीस असल्याचे सांगत परिसरात चोरीच्या घटना वाढल्या असल्याचे कारण देऊन पवार यांची झडती घेण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे पवार घाबरले. आरोपींनी त्यांच्या हातातील सुमारे ४० हजार रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या अंगठ्या काढून घेतल्या. या अंगठ्या सुरक्षित ठेवतो, तपासानंतर परत देतो, असे सांगत त्यांनी त्याऐवजी बनावट अंगठ्या पवार यांच्या हातात घातल्या. काही वेळानंतर हा प्रकार लक्षात येताच पवार यांना फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. तोपर्यंत आरोपी घटनास्थळावरून पसार झाले होते.

या प्रकरणी पवार यांनी मुदखेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून अज्ञात दोन इसमांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास जमादार ठाकूर करीत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी सुरू असून आरोपींचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

#### सतर्क राहण्याचे पोलिसांकडून आवाहन

पोलीस असल्याची बतावणी करून नागरिकांची फसवणूक करण्याच्या घटनांत वाढ होत असल्याने नागरिकांनी सतर्क राहावे, ओळखपत्राची खात्री करूनच कोणालाही मौल्यवान वस्तू द्याव्यात, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

---

# आरएफआयडीबायोमेट्रिकच्या नजरेतून पोलीस शिपाई भरती

प्रतिनिधी | नांदेड

नांदेड जिल्हा पोलीस दलातील १९९ पोलीस शिपाई पदांसाठी भरती प्रक्रियेला बुधवार (दि. ११) पासून औपचारिक सुरुवात झाली. पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने भरती पार पाडण्यासाठी प्रशासनाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेत कडेकोट व्यवस्था उभारली आहे. या पदांसाठी तब्बल १४ हजार ६८२ अर्ज प्राप्त झाल्याने स्पर्धा चुरशीची ठरणार आहे.

भरती प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली दोन अपर पोलीस अधीक्षक, पाच उपविभागीय पोलीस अधिकारी, ६० पोलीस अधिकारी आणि २५० पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्यात आली आहे. पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर मैदानी व शारीरिक चाचण्यांना प्रारंभ झाला असून त्यानंतर पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. वेळापत्रक टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात येणार असून अधिकृत संकेतस्थळ आणि संदेशाद्वारे उमेदवारांना माहिती दिली जाणार आहे. भरती प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये आणि गैरप्रकारांना आळा बसावा यासाठी आरएफआयडी तंत्रज्ञान, बायोमेट्रिक प्रणाली, ऑटो फोटो कॅप्चर तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. प्रत्येक उमेदवाराची उपस्थिती, धावण्याची वेळ आणि कामगिरी अचूकपणे नोंदविली जात असून संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्हीच्या कडेकोट निगराणीखाली पार पडत आहे. यासाठी १०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे तसेच ड्रोन कॅमेऱ्यांचीही नजर ठेवण्यात आली आहे. शारीरिक चाचणीत उमेदवारांची उंची व छाती मोजणी, १०० मीटर धावणे, १६०० मीटर धावणे (महिला उमेदवारांसाठी ८०० मीटर) तसेच गोळाफेक अशा विविध घटकांचा समावेश आहे.

---

# कोळी येथील शेतकऱ्याकडून माजी सैनिक कल्याणासाठी निधी

प्रतिनिधी | हदगाव

मौ. कोळी येथील शेत सर्वसामान्य शेतकरी दादाराव यांनी जिल्हाधिकारीयांच्या विनंतीला दाद देत स्व कष्टातून माजी सैनिक कल्याण निधीसाठी भरीव निधीचा धनादेश तहसीलदार हदगाव यांचे मार्फत जिल्हा सैनिक कल्याण खात्याकडे सुपूर्द केला.

कोळी येथील सर्वसामान्य जेष्ठ शेतकरी दादाराव संभाजी चौतमल यांनी सैनिक ,माजी सैनिक हे देशसेवेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावून आलेले असतात, सैनिक यांच्यामुळे प्रत्येक भारतीय सुरक्षित आहे. त्यांच्यासाठी आपल्या स्व कष्टातील कमाईतून फुल नाही तर फुलाची पाकळी का होईना, आपण मदत करणे कर्तव्य ठरते त्या भावनेतून पाच हजार रुपयांचा धनादेश जिल्हा माजी कल्याण निधी विभाग नांदेड यांना तहसीलदार हदगाव यांचे मार्फत जिल्हाधिकारी यांना संपूर्द केला यावेळी दान कर्ते दादाराव चौतमल, भाजपा प्रदेश सदस्य चंद्रशेखर पाटील, तालुका अध्यक्ष विलासराव महाजन, विजय चौतमल तहसीलदार सय्यद उमर, नायब तहसीलदार तामसकर. कर्मचारी रशीद भाई इत्यादी उपस्थित होते. शेतकरी दादाराव चौतमल यांचे सर्वत्र कौतुक होत असून हा आदर्श घेऊन ज्यांना जमेल तसा निधी माजी सैनिक कुटूंब तथा माजी सैनिक कल्याण निधीसाठी सहाय्क्य करावे.

---

# भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव

प्रतिनिधी | मुखेड

शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रभाग क्रमांक १० मधील विशेषतः गणपती मंदिर परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात असल्याने लहान मुले, वृद्ध नागरिक, महिला तसेच ये-जा करणाऱ्या नागरिकांना गंभीर त्रास सहन करावा लागत आहे.

या ठिकाणी आतापर्यंत जवळपास २० ते २५ जणांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याची माहिती समोर आली आहे. जखमींमध्ये लहान मुले, वृद्ध नागरिक आणि महिलांचा समावेश आहे. त्यामुळे परिसरात असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे.

या घटनांमुळे अनेक गरीब कुटुंबांना उपचारासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक खर्च करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वर डोईजड यांनी नगर परिषद प्रशासनाकडे निवेदन देऊन तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पकड मोहीम राबवून निर्बीजकरण करणे तसेच योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

#### उपजिल्हा रुग्णालयात इंजेक्शन नाहीत

कुत्रा चावल्यानंतर रुग्णास उपजिल्हा रुग्णालयात मागील दोन ते तीन महिन्यापासून आवश्यक श्वान दंशावरील औषधे व इंजेक्शन उपलब्ध नसल्याने काही रुग्णांना नांदेड येथे जावे लागत आहे. तर बाहेरून सुद्धा औषधी आणावे लागत आहे. परिणामी सामान्य नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

---

# संजय गांधी निराधार योजनेचे ३९९ अर्ज मंजूर

प्रतिनिधी | उमरी

संजय गांधी निराधार योजनेच्या बैठकीत तहसीलदार सौ. मंजुषा भगत यांनी सर्वप्रथम नवनियुक्त अध्यक्ष व सदस्यांचा शाल श्रीफळ देऊन शुभेच्छा दिल्या वेळी उपविभागीय अधिकारी सौ. स्वाती दाभाडे .यांनी नवनियुक्त पदाधिकारी व सदस्यना शुभेच्छा दिल्या. ही डॉ. विक्रम देशमुख. यांच्या उपस्थितीत पार पडली या बैठकीत ३९९ अर्ज मंजूर करण्यात आले. यांत दिव्यांग, परीतक्त्या ,विधवा, वयोवृद्ध, दुर्धर आजार असलेल्या लाभार्थ्यांचे समावेश आहे यां बैठकीस तहसीलदार मंजुषा भगत नायब तहसीलदार संजय सोलनकर. समितीचे सदस्य मारोती वाघमारे .प्रणिता जोशी. साहेबराव तुरेराव. पोषटी नवोड .सहायक महसूल अधिकारी गंगाधर टेम्भूर्णीवार, महसूल सहाय्यक अशोक कस्तुरे. आय टी अधिकारी धनंजय बोधनकर .ई समितीचे सदस्य अधिकारी उपस्थित होते.

---

कृत्रिमता | कागदी पत्रावळी वापराने नैसगिक चव हरवली ?

# पत्राळी व केळीपानावरील मेजवानी आता आठवणीतच

प्रतिनिधी | नांदेड

सार्वजनिक धार्मिक कार्यक्रम, जत्रा, कीर्तनसोहळे, तसेच विवाह समारंभ म्हटले की पंगतीत बसून केळीच्या पानावर किंवा पानाच्या पत्रावळीवर वाढलेले जेवण हीच खरी मेजवानी मानली जात असे. त्या हिरव्यागार पानाचा सुगंध, त्यावर वाढलेला गरमागरम भात, आमटी, भाजी आणि गोडधोड पदार्थ यांची चव काही औरच असायची. मात्र बदलत्या काळानुसार ही परंपरा आता हळूहळू लुप्त होताना दिसत आहे.

ग्रामीण भाग असो किंवा शहर, मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये पूर्वी केळीच्या पानांचा आणि पानाच्या पत्रावळींचा वापर मोठ्या प्रमाणात होत होता. परंतु कालांतराने त्यांची जागा विविध प्रकारच्या कागदी पत्रावळी, थर्माकोल किंवा तयार ताटांच्या आकारातील डिस्पोजेबल प्लेट्सनी घेतली आहे. बाजारात सहज उपलब्धता, कमी खर्च आणि सोयीस्कर वापर या कारणांमुळे आयोजकांचा कल या पर्यायांकडे वाढला आहे. केळी लागवडीचे प्रमाण घटल्याने मोठ्या प्रमाणात केळीची पाने उपलब्ध होणे कठीण झाले आहे. तसेच पारंपरिक पत्रावळी तयार करणाऱ्या कारागिरांची संख्या देखील कमी होत चालली आहे. परिणामी, नैसर्गिक व पर्यावरणपूरक पर्याय मागे पडत असून कृत्रिम साधनांचा वापर वाढला आहे. नव्या पद्धतींमुळे मनुष्यबळाची गरज कमी होते, वाढप्यांची संख्या कमी लागते आणि कार्यक्रमानंतर स्वच्छतेचे काम जलदगतीने पूर्ण करता येते. प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, झार, ग्लास यामुळे सोय वाढली असली तरी कचऱ्याचे प्रमाणही वाढत आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने ही बाब चिंताजनक मानली जात आहे. धकाधकीच्या जीवनशैलीत सोयीसुविधांना प्राधान्य दिले जात असले, तरी केळीच्या पानावरील जेवणाचा नैसर्गिक स्वाद आणि सांस्कृतिक अनुभव हळूहळू केवळ आठवणीतच उरू लागला आहे.



#### हरवली हिरवाईची पंगत!

- केळीच्या पानावर वाढलेले गरमागरम जेवण,
- पानाच्या पत्रावळीतील सुगंधी चव,
- धार्मिक व विवाह सोहळ्यांची ती खास ओळख.
- आज मात्र कागदी व डिस्पोजेबल ताटांची चलती,
- सोयीसुविधांमुळे परंपरा मागे पडताना दिसते.
- मनुष्यबळ कमी, काम झटपट पूर्ण
- पण हिरवाईची पंगत हरवत चालली आहे.

---

जुन्या पेन्शनसह विविध मागण्यांसाठी

# अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे आंदोलन

प्रतिनिधी | नांदेड



जुन्या पेन्शनसह विविध प्रलंबित मागण्यासाठी राज्य सरकारी, निमसरकारी अधिकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर गुरुवारी (दि.१२) धरणे आंदोलन करण्यात आले.

यानिमित्ताने शासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करा, दि.१ नोव्हेंबर २००५ पूर्वी विनाअनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त तसेच २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच वस्तीशाळा शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा, चतुर्थ श्रेणी कर्मचारी व वाहन चालक भरतीवरील बंदी तात्काळ उठवा, १०:२० :३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करा, व्यापक स्वास्थ विमा योजना लागू करावी, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, प्रतीक्षा यादीतील सर्व पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती द्या, सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्या संदर्भातील कार्यवाहीचा वेग वाढवावा, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नियुक्ती देण्यासंदर्भातील १९८१ च्या शासन निर्णयाची पूर्ण स्थापना करा, शिक्षकांचे जीवन उध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन आदेश बाबत पुन्हा विचार करण्यात यावा, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा पुनर्विचार करा, यासह अन्य काही प्रलंबित मागण्यासाठी हे धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मराठवाडा शिक्षक संघाचे विभागीय अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, जिल्हाध्यक्ष व्यंकटराव चिलवरवार, शहराध्यक्ष डी बी नाईक, उपाध्यक्ष आनंद मोरे, अब्दुल हसीब, अतनूरकर, ,बाबाराव घाटे, माधव कांजाळकर, शेख समीर, शेख अहमद यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.